- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,२१,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,१२,३५० /-
✔ चांदी : १,५८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ वर्ष : १ अंक : ३४१ किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

दोन लाखांवरील रोख व्यवहारांची माहिती थेट आयकर विभागाला जाणार

जमीन व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी फडणवीस सरकारचा मोठा निर्णय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुद्रांक नोंदणी महानिरीक्षकांना आदेश, दस्त नोंदणीच्या वेळीच रोख आणि चेकच्या रकमेची स्वतंत्र नोंद होणार

एकापेक्षा जास्त खरेदीदार-विक्रेते असल्यास प्रत्येकाचा स्वतंत्र हिशोब संकलित करणार, दुय्यम निबंधक कार्यालयांमार्फत दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत स्टेटमेंट ऑफ फाइनांशियल ट्रांजेक्शन्स (एसएफटी) थेट आयकर विभागाकडे जाणार, आय-सरिता प्रणालीत स्वतंत्र नोंदीची सुविधा; खरेदीदार आणि विक्रेत्याच्या व्यवहारांचा स्वतंत्र हिशेब



द. सिंहवाणी वृत्त, मुंबई

दस्त नोंदणी करताना दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिलेल्या व्यवहारांची माहिती आयकर विभागाला कळविण्याची प्रक्रिया अधिक सक्षम करण्यात येणार आहे. दस्त नोंदणीच्या वेळीच रोख आणि धनादेशाद्वारे दिलेल्या रकमेची स्वतंत्र नोंद करण्याची सुविधा नोंदणी व मुद्रांक विभागाच्या 'आय-सरिता' प्रणालीमध्ये करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकांना यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

मालमत्तेच्या खरेदी-विक्री व्यवहारात दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिली किंवा स्वीकारली गेल्यास त्याची माहिती आयकर विभागाला देणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने १६ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने तसेच आयकर कायद्यातील तरतुदींनुसार महसूल विभागाने याबाबत निर्देश दिले होते.

या निर्देशांनुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालयाने राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना रोख व्यवहारांची माहिती आयकर विभागाला पाठविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचा रोख व्यवहार झालेल्या दस्तांची माहिती दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत आयकर विभागाला पाठविणे आवश्यक आहे.

ही प्रक्रिया अधिक सोपी आणि अचूक करण्यासाठी आता 'आय-सरिता' प्रणालीत बदल करण्यात येणार आहेत. दस्त नोंदणी करतानाच खरेदीदाराने विक्रेत्याला किती रक्कम रोखीने दिली आणि किती रक्कम धनादेशाद्वारे दिली, याची स्वतंत्र नोंद करता येणार आहे. त्यामुळे व्यवहाराचा संपूर्ण तपशील नोंदणीच्या वेळीच उपलब्ध होईल. माहिती गोळा करण्यासाठी स्वतंत्रपणे कराची लागणारी प्रक्रिया कमी होणार आहे.

या सुविधेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे एका व्यवहारात एकापेक्षा अधिक खरेदीदार किंवा विक्रेते असल्यास प्रत्येकाचा स्वतंत्र आर्थिक तपशील नोंदविता येणार आहे. कोणत्या खरेदीदाराने किती रक्कम दिली आणि कोणत्या विक्रेत्याने किती रक्कम स्वीकारली, याची स्वतंत्र माहिती प्रणालीमध्ये उपलब्ध होईल. त्यामुळे प्रत्येक पक्षकाराच्या व्यवहाराचा अचूक तपशील आयकर विभागाला पाठविणे शक्य होणार आहे.

दुय्यम निबंधक कार्यालयांमार्फत दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत एसएफटी अहवाल आयकर विभागाला पाठविला जाणार आहे. या अहवालात खरेदीदार आणि विक्रेत्याचे नाव, पॅन क्रमांक, एकूण व्यवहाराची रक्कम, रोखीने दिलेली रक्कम, दस्त क्रमांक आणि नोंदणी दिनांक यांचा समावेश असेल.

या निर्णयामुळे जमीन आणि मालमत्तेच्या व्यवहारातील रोख रकमेचा तपशील अधिक अचूकपणे उपलब्ध होणार आहे. माहिती संकलनातील त्रुटी कमी होण्यासोबतच आयकर विभागाला अहवाल पाठविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होईल. आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढविणे आणि कायदेशीर तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

थोडक्यात

सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा घसरण

मुंबई/नवी दिल्ली : सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण सुरू असून गुंतवणूकदारांसह ग्राहकांनाही मोठा धक्का बसला आहे. गेल्या काही महिन्यांत विक्रमी उच्चांक गाठणाऱ्या या दोन्ही मौल्यवान धातूंचे भाव आता झपाट्याने खाली येत आहेत. शुक्रवारी भारतीय बाजारातही सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये मोठी घसरण झाली. विशेष म्हणजे, चांदीचा भाव प्रतिकिलो १.५० लाख रुपयांच्या खाली आला आहे. तर २४ कॅरेट सोन्याचा दर १० ग्रॅममागे सुमारे १.२१ लाख रुपयांपर्यंत घसरला आहे. लग्नसराईचा हंगाम सुरू होत असताना सोन्या-चांदीच्या दरातील ही घसरण ग्राहकांसाठी दिलासादायक ठरू शकते. मात्र, बाजारातील या घसरणीमुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शुक्रवारी चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली. चांदीचा भाव एका दिवसात ७ टक्क्यांहून अधिक घसरून प्रतिकिलो १,४६,८६८ रुपयांवर आला. म्हणजेच एका दिवसात चांदी सुमारे १० हजार रुपयांनी स्वस्त झाली. विशेष म्हणजे, जानेवारी २०२६ मध्ये चांदीचा भाव प्रतिकिलो ४.२१ लाख रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला होता. मात्र, त्यानंतर सातत्याने घसरण होत असून, सध्याचा भाव त्या उच्चांकापेक्षा जवळपास २.७५ लाख रुपयांनी कमी झाला आहे. काही आठवड्यांपूर्वी चांदीचा भाव पुन्हा १.५० लाख रुपयांच्या खाली येईल, अशी अपेक्षाही अनेकांना नव्हती. मात्र, जागतिक बाजारातील घडामोडींमुळे चांदीच्या किमतींवर मोठा दबाव निर्माण झाला आहे. चांदीप्रमाणेच सोन्याच्या किमतीतही मोठी घसरण झाली आहे. शुक्रवारी सोन्याचा भाव जवळपास ५ टक्क्यांनी खाली आला. २४ कॅरेट सोन्याचा दर १० ग्रॅममागे सुमारे १.२१ लाख रुपयांपर्यंत घसरला.

मणिपूरमध्ये विषारी दारुमुळे १५ जणांचा मृत्यू तर १८१ जणावर उपचार सुरु

वृत्तसंस्था, मणिपूर

मणिपूरच्या चंडेल जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. विषारी दारुमुळं अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. विषारी दारु प्यायल्याने मृतांचा आकडा ८ वरून १५ वर पोहोचला आहे. या घटनेनंतर लगेचच मुख्यमंत्री खेमचंद युमनाम यांनी लॅम्पेलपात येथील शिजा रुग्णालय आणि साजिवा येथील बबिना रुग्णालयाला भेट दिली. या रुग्णालयांमध्ये विषबाधेमुळे १८१ जणांवर उपचार सुरू आहेत. मुख्यमंत्र्यांनी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

मुख्यमंत्री खेमचंद युमनाम यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले की, डॉक्टरांच्या कडक देखरेखीखाली रुग्णांची तपासणी आणि उपचार सुरू आहेत. त्यांनी पुढे लिहिले की, त्यांनी दोन्ही रुग्णालयांच्या अधिकाऱ्यांना रुग्णांना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा आणि सर्वतोपरी मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. तेथील उपचार आणि मदतकार्याला अधिक बळकटी देण्यासाठी, सामान्य वैद्यकशास्त्रातील एका तज्ज्ञाच्या नेतृत्वाखालील एक वैद्यकीय पथक अत्यावश्यक औषधांसह चंडेल जिल्ह्यासाठी रवाना झाले आहे.खेमचंद युमनाम यांनी पुढे लिहिले, रुग्ण लवकरात लवकर आणि पूर्णपणे बरे व्हावेत अशी माझी इच्छा आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रति मी माझ्या तीव्र संवेदना व्यक्त करतो. सरकार या प्रकरणाची चौकशी करून दोषींना शिक्षा देईल असे ते म्हणाले.

चंडेल जिल्ह्यातील शिजा रुग्णालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. चेतन खुंदोंगबाम म्हणाले, जेव्हा रुग्ण आले, तेव्हा आमच्या लक्षात आले की हे मिथेनॉल विषबाधेचे प्रकरण आहे. हे प्रामुख्याने चकपिकारोंग भागातील आहे. आतापर्यंत आमच्याकडे १४० रुग्ण दाखल झाले आहेत, त्यापैकी दुर्दैवाने एकाचा मृत्यू झाला आहे. त्याला मृत अवस्थेत आणण्यात आले होते. तीन रुग्णांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर हेमोडायलिसिस सुरू आहे.

आमच्याकडील सर्व उपलब्ध खाटा भरलेल्या आहेत, त्यामुळे रुग्णांवर उपचार करण्यासाठी आम्ही राज्य आरोग्य विभाग, आरआयएमएस आणि JNIMS यांची मदत मागितली आहे. आम्ही काही रुग्णांना इतर केंद्रांमध्ये हलवत आहोत, तर ज्यांना जीवनरक्षक प्रणाली किंवा हेमोडायलिसिसची आवश्यकता आहे अशा गंभीर आजारी रुग्णांना येथेच ठेवण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी भेट देऊन सर्व रुग्णांना आश्वासन दिले की, राज्य आरोग्य विभाग सर्वतोपरी मदत करेल.

मणिपूरच्या चंडेल जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांनी सांगितले की, मृताने कथितरित्या सेवन केलेली दारू काकचिंग जिल्ह्यातील सुगानू येथून खरेदी करण्यात आली होती. त्यांनी पुढे सांगितले की, चंडेलमध्ये स्थानिक दारू उत्पादन किंवा अवैध दारू उत्पादनाबद्दल कोणतीही माहिती नाही. पोलिसांच्या निवेदनात म्हटले आहे, "पुढील सूचना मिळेपर्यंत जनतेने स्थानिक पातळीवर उत्पादित दारूचे सेवन करू नये.

मंत्री नरहरी झिरवाळ यांचे तत्कालीन पीए डॉ. रामदास गाडे निलंबित

वृत्तसंस्था, मुंबई

मंत्री नरहरी झिरवाळ यांचे तत्कालीन खाजगी सचिव रामदास गाडे यांचे निलंबन करण्यात आले आहे. अन्न व औषधी प्रशासन खात्यातील लिपिक राजेंद्र ढेरिंगे याला लाचलुचपत खात्याच्या अधिकाऱ्याने ५० हजार रुपयांपैकी ३५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले होते. महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार असे नमूद करण्यात आले आहे की, ज्याअर्थी डॉ. रामदास गाडे, सहाय्यक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालय, मावळ, जि. पुणे यांनी केलेल्या गैरशिस्त व गैरवर्तणूक यामुळे त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्याअर्थी आता राज्यपाल महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील नियम ४ च्या पोटनियम (१) (अ) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून याद्वारे उक्त डॉ. रामदास गाडे, सहाय्यक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालय, मावळ, जि. पुणे यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून निलंबित करीत आहेत आणि ते पुढील आदेश काढले जाईपर्यंत निलंबित राहतील. आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अमलात असेल तेवढ्या कालावधीत डॉ. रामदास गाडे, सहाय्यक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालय, मावळ, जि. पुणे यांचे मुख्यालय जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त कार्यालय, जि. पुणे येथे राहील आणि उक्त डॉ. रामदास गाडे, सहाय्यक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालय, मावळ, जि. पुणे यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

चौकशीला उशीर झाल्याने संभ्रम वाढतोय

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे



वृत्तसंस्था, पुणे


राज्यातील वाढती दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांना मिळणारी केंद्राची मदत, बारामती विमानतळाचा विकास आणि दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघातावरून सुरू असलेले राजकारण या सर्वच मुद्यांवर राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज सविस्तर भूमिका मांडली. राज्यातील दुष्काळी स्थितीवर बोलताना भरणे म्हणाले, पूर्वी ३०४ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला होता, त्यात आता ६ तालुक्यांची वाढ होऊन ३१० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. पंचनाम्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. एनडीआरएफच्या मदतीच्या हेक्टरी दरात वाढ झाल्याने आता नव्या दराने फेरप्रस्ताव केंद्राकडे पाठवावा लागेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली असून, केंद्राकडून लवकरात लवकर भरीव मदत मिळेल. दिवाळीपूर्वी सुमारे ९५ लाख ते १ कोटी शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची अग्रिम मदत देण्यात आली आहे.

ई-केवायसी आणि सामाईक जमिनीच्या कागदपत्रांमुळे वंचित राहिलेल्या सुमारे १० लाख शेतकऱ्यांच्या खात्यावरही लवकरच ही रक्कम जमा केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत बोलताना भरणे म्हणाले, अजितदादांचा एक जवळचा कार्यकर्ता म्हणून या अपघाताचे सत्य १०० टक्के समोर आले पाहिजे, असे मला वाटते. तपासाला उशीर होत असल्याने संभ्रम आणि गैरसमज तयार होत आहेत. पुण्यातील कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनीही अमित शहा यांना तपास लवकर पूर्ण करण्याची विनंती केली आहे. आमदार रोहित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांचा फोटो दाखवत केलेल्या मफलर मॅन च्या आरोपावर भरणे यांनी फडणवीसांची पाठराखण केली.

दूध का दूध पानी का पानी होऊ द्या

कोणासोबत फोटो काढला किंवा कोणी लग्नात मफलर गिफ्ट दिला म्हणजे काहीतरी वेगळा अर्थ होत नाही. अजितदादा आणि फडणवीस यांचे नाते मी जवळून पाहिले आहे. त्यामुळे कोणीही विनाकारण वक्तव्ये न करता तपासातून दूध का दूध आणि पानी का पानी होऊ द्यावे असे ते म्हणाले.



संपादकीय लेखणीतून...

विमान अपघाताचा संशय कायम

अजित पवार यांच्या विमान अपघाताला साडेनऊ महिने उलटूनही तपासात ठोस माहिती समोर आलेली नाही. विमान कंपनी व्हीएसआरचे प्रमुख व्ही. के. सिंग आणि त्यांचे पुत्र रोहित सिंग यांच्याशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जवळचे संबंध असल्याने ते कंपनीला वाचवत असल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला. व्हीएसआरला वाचवणारा मफलर मॅन म्हणजे देवेंद्र फडणवीस अशी टीकाही त्यांनी केली. जयपूरमध्ये नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या रोहित सिंग यांच्या विवाह सोहळ्याला फडणवीस उपस्थित होते. त्यामुळे रोहित पवार यांची संशयाची सुई फडणवीसांच्या दिशेने फिरू लागल्याचे दिसते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणात व्हीएसआर विमान कंपनी आणि मालक व्ही. के. सिंग यांना वाचवणारा मफलर मॅन म्हणजे मुख्यमंत्री फडणवीस हेच आहेत, असे जाहीर करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार आणि अजितदादांचे पुतणे रोहित पवार यांनी सोमवारी खळबळ उडवून दिली.

मफलर घातलेला फोटो दाखवतानाच, फडणवीस यांचा या अपघातात हात आहे असे मी म्हणत नाही, असेही रोहित पवार म्हणाले. असे असले तरी या प्रकरणात थेट फडणवीसांनाच ओढल्यामुळे एकच खळबळ उडाली. अजित पवार यांच्या अपघाताची निधनासंबंधातील संभ्रम त्यांच्या मृत्यूनंतर सुमारे दहा महिन्यांनंतरही कायम आहे. हा विषय रोहित पवार यांनी अत्यंत आक्रमकपणे लावून धरला आहे. या अपघातासंदर्भातील काही महत्त्वाचे मुद्दे त्यांनी यापूर्वीच मांडले असून, हा अपघात नसून घातपातच आहे असा निष्कर्ष त्यावेळीच काढला होता. जर तो घातपात असेल तर तो घडवला कोणी हा यातला मुख्य मुद्दा आहे.

त्यामुळे त्या अनुषंगाने रोहित पवार नव्याने काय माहिती देतात याविषयी उत्सुकता होती. रोहित पवार यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन थेट मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दिशेने संशयाची सुई फिरवली आहे. रोहित पवार यांची पत्रकार परिषद होण्याआधी मुंबईत आणि पुण्यात काही ठिकाणी एका मफलर मॅनविषयी संशय व्यक्त करणारी पोस्टर्स जारी करण्यात आली होती. सस्पेन्स संपवताना रोहित पवार यांनी सनसनाटी पद्धतीने फडणवीस यांचा संशयित आरोपी व्यक्तींबरोबरचा मफलरमधला फोटो पत्रकारांना दाखवला. अजित पवार यांच्या ज्या विमानाला अपघात झाला ते विमान ज्या कंपनीच्या मालकीचे आहे त्या कंपनीच्या मालकावर रोहित पवार यांचा संशय आहे. त्या मालकाशी फडणवीस यांचे व्यक्तिगत संबंध असल्याचे आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केले. निवडणुकीचा निकाल ज्या दिवशी जाहीर होणार होता त्या दिवशी फडणवीस या आरोपीशी संबंधित एका लग्न समारंभासाठी जयपूरला गेले होते.

रोहित पवारांचे म्हणणे की, राज्याच्या निवडणुकांची धुरा ज्या व्यक्तीच्या खांद्यावर होती ती व्यक्ती निवडणूक निकालाच्या दिवशीच असे बाहेरगावी जाण्याची शक्यता नाही, तरीही फडणवीस गेले याचा अर्थ त्यांचा या संशयिताशी खूप निकटचा संबंध आहे आणि तेच त्यांना वाचवत आहेत. रोहित पवारांनी आरोप केले त्याच दिवशी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सुद्धा पुण्यात होते. त्यावेळी फडणवीस यांनी त्यांच्याकडे अजित पवार यांच्या अपघात चौकशीचे काम त्वरित पूर्ण व्हावे अशी मागणी केली. यातील दोषींना फासावर लटकवण्याचे मनोगतसुद्धा त्यांनी व्यक्त केले. याद्वारे फडणवीस यांनी आपल्यावरील संशयाचे मळभ दूर लोटण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी मूळ विषयावरून निर्माण झालेले संशयाचे धुके पूर्णपणे दूर झालेले नाही.

अपघाताच्या चौकशीला होत असलेला विलंब हे यामागचे मुख्य कारण असून दुसरे एक मुख्य कारण म्हणजे, या प्रकरणात अद्याप महाराष्ट्र पोलिसांनी एफआयआरसुद्धा दाखल केलेला नाही. एफआयआर नोंदवण्यासाठी केली जाणारी टाळाटाळ संशयाचे धुके अधिक गडद करणारी ठरते. या प्रकरणात एफआयआर दाखल व्हावा यासाठी रोहित पवार यांनी खूप आटापिटा केला पण त्यांना यश आले नाही. अखेर त्यांनी कर्नाटकात जाऊन तेथील काँग्रेस सरकारमार्फत या प्रकरणी एफआयआर नोंदणी केली. हा सारा तपशील वाचल्यानंतर लोकांच्या मनातही अनेक शंका उपस्थित होणे साहजिक आहे. राज्याची महत्त्वाची व्यक्ती दगावली असताना त्या प्रकरणाच्या चौकशीत विलंब आणि हेळसांड होत असेल तर संशयाच्या सुईचे टोक अधिक टोकदार होणारच. त्यामुळे चौकशीला नुसता वेग येऊन चालणार नाही तर त्यातील नेमके सत्यही तातडीने समोर येणे गरजेचे आहे.

जागतिक आणीबाणीची सज्जता: विकसित राष्ट्रांचे नवे धोरण

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

अलीकडच्या काळात युनायटेड किंगडम, फ्रान्स, जपान आणि बेल्जियम यांसारख्या जगातील प्रमुख विकसित राष्ट्रांनी आपल्या नागरिकांना किमान ७२ तास म्हणजेच तीन दिवस ते एक आठवडा स्वतःची काळजी स्वतः घेता येईल, इतकी आणीबाणीची तयारी ठेवण्याचे आवाहन केले आहे. समाजमाध्यमांवर या सरकारी सूचनांकडे अनेकदा तिसऱ्या महायुद्धाची नांदी किंवा कोणत्यातरी महाभयंकर संकटाची चाहूल म्हणून पाहिले जात आहे. तथापि, या सर्व देशांच्या सरकारांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत नमूद केले आहे की, नजीकच्या भविष्यात कोणतेही युद्ध किंवा महाआपत्ती लगेच उद्भवणार आहे असा याचा अर्थ होत नाही.

उलटपक्षी, बदलत्या जागतिक परिस्थितीत आणि वाढत्या अस्थिरतेच्या काळात जर वीज, पाणीपुरवठा किंवा आंतरजाल सेवा अचानक खंडित झाली, तर सामान्य नागरिकांनी गोंधळून जाऊ नये आणि समाज अधिक सक्षम राहावा, हा या व्यापक मोहिमेमागचा मुख्य धोरणात्मक हेतू आहे.

या नव्या धोरणामागे मुख्यत्वे चार महत्त्वाची कारणे दडलेली असून त्यातील पहिले आणि सर्वात संवेदनशील कारण म्हणजे वाढता भू-राजकीय तणाव आणि संकरित हल्ल्यांचा धोका होय. रशिया आणि युक्रेन यांच्यातील दीर्घकाळ चाललेले युद्ध तसेच मध्य पूर्वेतील सततचा संघर्ष यामुळे युरोपमधील पारंपरिक सुरक्षा व्यवस्था पूर्णपणे बदलली असून, थेट लष्करी आक्रमणापेक्षा शत्रू राष्ट्रांकडून वीज वितरण जाळे, समुद्राखालील आंतरजाल वाहिन्या, वाहतूक व्यवस्था आणि पुरवठा साखळीची तोडफोड केली जाण्याची भीती सरकारांना सतावत आहे. याच जोडीला आधुनिक जनजीवन डिजिटल प्रणालीवर अवलंबून असल्याने सायबर हल्ल्यांमुळे बँकिंग व्यवहार, एटीएम यंत्रणा किंवा रुग्णालये ठप्प होण्याचा धोका वाढला आहे; याची प्रचिती ऑक्टोबर २०२६ मध्ये फ्रान्समधील सुमारे ७०० दुकानांच्या प्रणालींवर झालेल्या सायबर हल्ल्यांतून आली.

याशिवाय हवामान बदलामुळे वाढलेले पूर, चक्रीवादळे, वणवे तसेच जपानमधील भूकंप व त्सुनामीचा कायमस्वरूपी धोका होदेखील महत्त्वाची कारणे आहेत. कोणत्याही मोठ्या संकटाच्या पहिल्या ७२ तासांत पोलिस, अग्निशमन दल आणि वैद्यकीय यंत्रणा गंभीर बाधितांना वाचवण्यात व्यस्त असतात; त्यामुळे सामान्य कुटुंबांनी सुरुवातीचे तीन दिवस स्वतःची व्यवस्था केल्यास बचाव यंत्रणेवरील ताण कमी होऊन त्यांना अत्यंत गरजूंपर्यंत वेगाने पोहोचता येते.

याच दूरदृष्टीतून विविध देशांनी टप्प्याटप्प्याने नियोजनबद्ध पावले उचलली आहेत. युनायटेड किंगडमने ऑक्टोबर २०२६ मध्ये आपली 'बी रेडी' ही जनजागृती मोहीम पुन्हा सुरू करून नागरिकांना वीज, पाणी, दूरध्वनी किंवा आंतरजाल सेवेशिवाय तीन दिवस म्हणजेच ७२ तास राहण्यासाठी आवश्यक साठा ठेवण्याचे आवाहन केले, तर याआधीच २०२५ च्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणात त्यांनी रशियाचा धोका, सायबर हल्ले आणि तोडफोडीचा स्पष्ट उल्लेख केला होता. फ्रान्सनेही 'तूस रेस्पॉन्साबल' ही मार्गदर्शिका प्रसिद्ध करून ऑक्टोबर २०२६ मध्ये ७२ तासांचे आणीबाणी संच तयार ठेवण्याच्या सूचना दिल्या असून, त्यात नैसर्गिक आपत्ती, औद्योगिक व अणु अपघात तसेच युद्धजन्य परिस्थितीतील खोट्या अफवांपासून सावध राहण्याचे मार्गदर्शन केले आहे.

आशियातील जपानने नोव्हेंबर २०२६ मध्ये नवीन आपत्ती व्यवस्थापन संस्था कार्यान्वित करून भूकंप व त्सुनामीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना किमान तीन दिवस आणि शक्यतो एक आठवडा पुरेल इतका अन्न व पाण्याचा साठा ठेवण्याचे आवाहन केले आहे. दुसरीकडे, बेल्जियमने एप्रिल २०२६ मध्ये चार वर्षांची राष्ट्रीय योजना जाहीर करून ७२ तासांच्या एटीएम यंत्रे आणि डिजिटल देयके चालणार नाहीत, हे लक्षात घेऊन काही प्रमाणात रोख रक्कम घरात ठेवणे गरजेचे मानले गेले आहे.

आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रथमोपचार पेटी, नियमित लागणारी औषधे, अतिरिक्त चष्मा, उबदार कपडे व पांघरूण आणि ओळखपत्रे व वैद्यकीय चिठ्ठ्यांच्या प्रती जलरोधक पिशवीत सुरक्षित ठेवण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

अर्थात, या सर्व सरकारी मोहिमांचे स्वागत होत असतानाच काही स्तरांतून त्यावर टीकाही केली जात आहे. काही विश्लेषक आणि नागरिकांच्या मते, सरकारे आपल्या पायाभूत सुविधांच्या कमतरता आणि सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी लपवण्यासाठी संकटाच्या काळातील जबाबदारी सामान्य नागरिकांवर ढकलत आहेत. तथापि, आजच्या अत्यंत गुंतागुंतीच्या आणि एकमेकांवर अवलंबून असलेल्या आधुनिक जगात कोणतीही यंत्रणा १०० टक्के अजेय असू शकत नाही, हे वास्तव नाकारता येत नाही. त्यामुळेच विकसित राष्ट्रांच्या या आवाहनाकडे भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून न पाहता, अचानक उद्भवणाऱ्या कोणत्याही नैसर्गिक, तांत्रिक किंवा मानवी संकटात समाजाला अधिक चिवट, जागरूक आणि स्वयंपूर्ण बनवण्याची एक दूरगामी व आवश्यक प्रक्रिया म्हणून पाहणे अधिक सयुक्तिक ठरते.

- ९५६१५९४३०६

वेलिंग्टन कसोटी : न्यूझीलंडचे पुनरागमन, भारताची दमदार प्रतिउत्तराची सुरुवात!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

दुसऱ्या दिवसाचा आढावा : निकोल्स-फिलिप्सची शतके, बुमराहची झुंज आणि जयस्वालची आक्रमक फलंदाजी

वेलिंग्टनच्या बेसिन रिझर्व्ह मैदानावर सुरू असलेल्या भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याचा दुसरा दिवस दोन्ही संघांसाठी वेगवेगळे संदेश देणारा ठरला. पहिल्या दिवशी अवघ्या ७० धावांत पाच फलंदाज गमावलेल्या न्यूझीलंडने हेन्री निकोल्स आणि ग्लेन फिलिप्स यांच्या अफलातून फलंदाजीच्या जोरावर केवळ डाव सावरलाच नाही, तर भारतासमोर ३६९ धावांचे आव्हान उभे केले. प्रत्युत्तरात भारतीय सलामीवीरांनीही आक्रमक आणि संयमी फलंदाजीचा सुरेख समन्वय साधत दिवसअखेर भारताला मजबूत स्थितीत आणले.

दुसऱ्या दिवसाचा खरा नायक न्यूझीलंडचा हेन्री निकोल्स ठरला, तर भारतीय बाजूने यशस्वी जैस्वालने आपल्या आक्रमक फलंदाजीने सामन्याचे चित्र बदलण्याची क्षमता दाखवून दिली.

निकोल्स-फिलिप्सची ऐतिहासिक भागीदारी; भारतीय गोलंदाजांची कसोटी!

पहिल्या दिवसाच्या अखेरीस ५ बाद २४३ अशा स्थितीत असलेल्या न्यूझीलंडने दुसऱ्या दिवशीही भारतीय गोलंदाजांचा कस लागेल अशी फलंदाजी केली. हेन्री निकोल्सने आपल्या कालच्या ११३ धावांच्या खेळीला पुढे नेत नाबाद १७५ धावांपर्यंत मजल मारली. तब्बल ३३५ चेंडूंचा सामना करताना त्याने २१ चौकार लगावले. त्याची फलंदाजी म्हणजे कसोटी क्रिकेटमध्ये संयम, एकाग्रता आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमतेचे उत्तम उदाहरण ठरले. दुसऱ्या बाजूला ग्लेन फिलिप्सनेही आपले दुसरे कसोटी शतक झळकावले. त्याने १९३ चेंडूत ११८ धावा करताना १३ चौकार लगावले. विशेष म्हणजे त्याचे हे सलग दुसरे कसोटी शतक होते.

या दोघांनी सहाव्या विकेटसाठी तब्बल २१६ धावांची भागीदारी केली. पहिल्या दिवशी ७० धावांत पाच फलंदाज गमावणाऱ्या न्यूझीलंडला त्यांनी सन्मानजनक स्थितीत आणून ठेवले. आकाश दीपने अप्रतिम चेंडूवर फिलिप्सचा त्रिफळा उडवून ही भागीदारी संपुष्टात आणली. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी उर्वरित फलंदाजांना फारशी संधी दिली नाही. न्यूझीलंडचा पहिला डाव १२१ षटकांत ३६८ धावांवर संपुष्टात आला.

बुमराहचा प्रभाव, आकाशदीपची प्रभावी साथ

भारतीय गोलंदाजीचा विचार करता जसप्रीत बुमराहने ९२ धावांत चार बळी मिळवले. वर्षभराच्या विश्रांतीनंतर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणाऱ्या बुमराहने आपल्या अनुभवाची आणि गुणवत्तेची चुणूक दाखवली. आकाश दीपने ५३ धावांत तीन बळी घेत त्याला उत्तम साथ दिली. अंशुल कंबोजने दोन, तर प्रसिद्ध कृष्णाने एक बळी मिळवला.

मात्र भारतीय गोलंदाजीतील एक मोठी उणीव प्रकर्षाने जाणवली. पहिल्या दिवशी न्यूझीलंडचे पाच फलंदाज बाद केल्यानंतरही भारतीय गोलंदाजांना निकोल्स आणि फिलिप्स यांच्यावर पुरेसे दडपण निर्माण करता आले नाही. दुसऱ्या दिवशीही सुरुवातीच्या सत्रात योग्य टप्प्यावर गोलंदाजी करण्यात सातत्याचा अभाव दिसला. कधी चेंडू फलंदाजांच्या पायांजवळ पडत होता, तर कधी अधिक उसळीमुळे फलंदाजांना सहज सोडता येत होता. विशेषतः ७० धावांत पाच बळी गमावलेल्या संघाला ३६८ धावांपर्यंत मजल मारू देणे, ही भारतीय गोलंदाजीच्या रणनीतीसाठी चिंतेची बाब आहे.

जयस्वालचा धडाका; न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर प्रतिहल्ला!

३६९ धावांचे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवून मैदानात उतरलेल्या भारतीय संघाला सुरुवातीपासूनच न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाजांनी आव्हान दिले. मॅट हेन्री आणि काइल जेमिसन यांनी नव्या चेंडूचा अचूक वापर करत भारतीय सलामीवीरांची परीक्षा घेतली. मात्र यशस्वी जयस्वालने आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीत फलंदाजी करत न्यूझीलंडच्या गोलंदाजांना बचावात्मक पवित्रा घेण्यास भाग पाडले. त्याने अवघ्या ८९ चेंडूत ८५ धावा फटकावताना १६ चौकार लगावले. त्याच्या फलंदाजीतील आत्मविश्वास, चेंडूची निवड आणि फटक्यांमधील वैविध्य विशेष लक्षवेधी होते. दुसऱ्या बाजूला के. एल. राहुलने अधिक जबाबदारीने फलंदाजी केली. त्याने नाबाद ५२ धावा करत जैस्वालला भक्कम साथ दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ११६ धावांची भागीदारी केली. जैस्वालला मॅट हेन्रीने बाद करून ही जोडी फोडली. त्यानंतर देवदत्त पडिक्कलने राहुलला साथ देत दिवसअखेर नाबाद १६ धावा केल्या. दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताची स्थिती ३९ षटकांत १ बाद १५९ अशी होती. न्यूझीलंडच्या पहिल्या डावातील धावसंख्येपेक्षा भारत अजून २०९ धावांनी मागे आहे.

गंभीरच्या रणनीतीचे मूल्यमापन आवश्यक!

या कसोटीच्या पहिल्या दोन दिवसांतील खेळातून भारतीय संघाच्या रणनीतीविषयी काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. पहिल्या दिवशी सुरुवातीला मिळालेल्या यशाचे मोठ्या आघाडीत रूपांतर करण्यात भारतीय गोलंदाज अपयशी ठरले. निकोल्स आणि फिलिप्स यांच्यातील भागीदारी मोडण्यासाठी क्षेत्ररक्षणातील बदल, गोलंदाजीतील विविधता आणि आक्रमक योजना यांचा अधिक परिणामकारक वापर अपेक्षित होता. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार शुभमन गिल यांच्यासाठी ही बाब आत्मपरीक्षणाची आहे.

- ९०९६३७२०८२

'गोधडी' एक मायेची उब

शशिकांत तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ

गोधडी ही केवळ जुन्या कपड्यांपासून तयार झालेली वस्तू नसून आजी-आईची माया,बालपणींच्या आठवणी, कौटुंबिक जिव्हाळा आणि ग्रामीण संस्कृतीचा वारसा आहे. ग्रामीण संस्कृतीचा पट उलगडतांना काही वस्तू नकळत मनाच्या खोल कप्पांत जाऊन बसतात. त्याचे मोल बाजारभावात मोजता येत नाही. कारण त्याच्यांशी भावनांचे, नात्यांचे आणि जगण्याचे धागे जोडले असतात. गोधडी सुद्धा त्यापैकीच एक होय.

पूर्वी ग्रामीण भागातील प्रत्येक घरात गोधडीत विशेष स्थान असायचे. घरातील जुन्या साड्या, लुगडी, धोतर,सदरा आदी कपडे निरुपयोगी झाले की ते फेकून दिले जात.घरातील महिला एकत्र बसून गोधडी शिवण्याचे काम हाती घेत.हातात सुई दोऱ्याची गुंडी आणि समोर रंगबिरंगी चिंध्यांचा पसारा यातून उबदार अविष्कार आकारास येत असत. ऐकऐके तुकडा जोडताना त्यातून आकार घेत असे एक दीर्घकाळ टिकणारे उबदार विश्व.त्या गोधडीत केवळ कपड्यांचे तुकडे नसायचे.तर त्यात आजीच्या जुन्या लुगड्याची आठवण आणि आईच्या आवडत्या साडीचा रंग असायचा. वडीलांच्या जुन्या सदऱ्याचा स्पर्श असायचा.तर कधी भावाच्या बालपणीच्या कपड्याची निरागसता असायची.म्हणून गोधडी अंगावर घेताना केवळ थंडीपासून संरक्षण मिळत असे,तर घरातील माणसांच्या आठवणींची उबही मिळत असे.



गोधडी शिवण्यात कला दिसून येते. त्यातील रंगसंगती, ठिगळांची मांडणी, सुई दोऱ्यांनी केलेली टाक्यांची रचना यातून कल्पकता दिसून येते. गोधडी शिवताना कौटुंबिक गप्पा रंगायच्या, सुख- दुःखाची देवाणघेवाण व्हायची.त्या निमित्याने नात्यांमधील स्नेह अधिक घट्ट होत असे.आजीने बनविलेली गोधडी नातवंडासाठी मायेची ऊब ठरत असे. काळ बदलला. गोधडीची जागा आधुनिक पांघरुणांनी घेतली. रेडीमेड वस्तूंच्या बाजारपेठेत तिचे महत्व काहीसे कमी झाले. जुन्या वस्तूंचा पुर्नवापर करण्याचे शहाणपण मागे पडू लागले.आज पर्यावरण संवर्धन आणि वस्तूंच्या पुर्नवापराची चर्चा होत असताना ग्रामीण लोकसंस्कृतीतील गोधडीची परंपरा आपल्याला शाश्वत जीवन शैलीचा महत्वपूर्ण संदेश देते.

आज गोधडी अभावानेच दिसते.ती जुनी,साधी आणि विस्मरणात गेलेली वस्तू वाटत असली तरी तिच्या प्रत्येक चिंधीत आटवणी दडल्या आहेत.प्रत्येक गोधडीच्या टाक्यात नातं,प्रत्येक रंगात मायेचा एक पदर दडलेला आहे. म्हणून गोधडीला मर्मबंधातली ठेव मानने रास्त आहे.

- ९१३०८३५४५८

क्रांतिकारक बटुकेश्वर दत्त : स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक तेजस्वी पर्व!

सौ. माधुरी धनोकार,
अकोला

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास म्हणजे त्याग, शौर्य, संघर्ष आणि देशभक्तीची प्रेरणादायी गाथा. या इतिहासात अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. अशाच महान क्रांतिकारकांपैकी एक म्हणजे बटुकेश्वर दत्त!

१८ नोव्हेंबर १९१० रोजी बंगालमध्ये जन्मलेल्या बटुकेश्वर दत्त यांनी अगदी तरुण वयातच देशसेवेचा मार्ग स्वीकारला. इंग्रजांच्या अन्यायकारक राजवटीविरुद्ध त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. देशाला परकीय गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी क्रांतिकारी चळवळीत सहभाग घेतला.

विधानसभेतील बॉम्बस्फोट आणि क्रांतिकारी विचार

८ एप्रिल १९२९ रोजी भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी दिल्लीतील केंद्रीय विधानसभेत कमी तीव्रतेचे बॉम्ब फेकले. या कृतीमागे कोणाचाही जीव घेण्याचा उद्देश नव्हता, तर इंग्रज सरकारच्या अन्यायकारक कायद्यांविरोधात आवाज उठवणे हा हेतू होता. बॉम्ब फेकल्यानंतर त्यांनी पळून जाण्याऐवजी स्वतःला अटक करून घेतले आणि 'इन्कलाब जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या.

त्यांच्या या धाडसी कृतीने संपूर्ण देशाचे लक्ष स्वातंत्र्यलढ्याकडे वेधले. भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांची मैत्री, देशप्रेम आणि त्याग आजही तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.

कारावासातील संघर्ष आणि त्याग

या घटनेनंतर बटुकेश्वर दत्त यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये म्हणजेच काळ्या पाण्याच्या शिक्षेसाठी पाठवण्यात आले. तुरुंगातील अमानुष वागणूक आणि राजकीय कैद्यांवरील अन्यायाविरुद्ध त्यांनी उपोषणात सहभाग घेतला. स्वातंत्र्यसैनिकांना सन्मानाची वागणूक मिळावी, ही त्यांची ठाम भूमिका होती. १९३८ मध्ये त्यांची तुरुंगातून सुटका झाली.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

स्त्री साहित्याने सामाजिक, राजकीय आणि आर्थिक वास्तवाचा वेध घ्यावा!

डॉ. प्रभा गणोरकर यांचे प्रतिपादन, नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

स्त्री साहित्याचा विचार करताना केवळ स्त्रिया काय लिहितात, एवढ्यापुरता विचार मर्यादित राहू नये. त्यांनी आणखी काय लिहायला हवे, कोणत्या विषयांना स्पर्श करायला हवा आणि स्त्री साहित्याच्या वैचारिक विश्वात कोणत्या नव्या शक्यता निर्माण होऊ शकतात, याचाही विचार होणे आवश्यक आहे. व्यक्तिगत अनुभवांच्या पलीकडे जाऊन व्यापक सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि वैचारिक वास्तवाचा शोध स्त्री लेखनाने घ्यायला हवा. तसेच प्रस्थापित व्यवस्थांना प्रश्न विचारण्याचे धाडस साहित्याने दाखवायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि संमेलनाध्यक्ष डॉ. प्रभा गणोरकर यांनी केले.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून तसेच स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित महिला महाविद्यालयाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय नागपूर



जिल्हा महिला साहित्य संमेलनाचे शुक्रवारी संमेलनाध्यक्ष डॉ. प्रभा गणोरकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. स्वागताध्यक्ष व स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य श्रीपाद अपराजित, डॉ. प्रमोद मुनघाटे आणि महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रीता सोनटक्के यांची मंचावर उपस्थित होती.

समकालीन स्त्री साहित्याची वाटचाल, त्यातील विषयवैविध्य आणि भविष्यातील लेखनाची दिशा यावर डॉ. गणोरकर यांनी सविस्तर भाष्य केले. मराठी स्त्री लेखनाची परंपरा अत्यंत समृद्ध असल्याचे सांगत त्या म्हणाल्या, बदलते कौटुंबिक जीवन, विवाहसंस्था, मातृत्व, लैंगिकता, शहरीकरण, स्थलांतर, एकटेपणा, पिढ्यांमधील संघर्ष आणि बदलती जीवनमूल्ये हे आजच्या स्त्री लेखनाचे महत्त्वाचे विषय आहेत. दलित, बहुजन आणि आदिवासी स्त्रियांचे लेखन सामाजिक विषमता, जातीय शोषण, विस्थापन, श्रम आणि अस्तित्वाचा संघर्ष यांचे वास्तव मांडत आहे.

स्त्री साहित्याने आता ज्ञान-विज्ञान, कायदा, आंतरराष्ट्रीय संबंध, सार्वजनिक धोरण, राजकारण आणि अर्थकारण यांसारख्या विषयांकडेही वळण्याची आवश्यकता आहे. जागतिकीकरण, भांडवलशाही, ग्राहकसंस्कृती आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचा स्त्रियांच्या जीवनावर होणारा परिणामही लेखनातून व्यक्त व्हायला हवा आणि स्त्रियांच्या एकटेपणाचा आणि बदलत्या पिढ्यांमधील संघर्षाचा अधिक सखोल वेध घ्यायला हवा, असे त्यांनी नमूद केले.

जैवतंत्रज्ञान, डिजिटल निरीक्षण, माहितीचे नियंत्रण, हवामान बदल आणि पर्यावरणीय संकटे हे विषयही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. तंत्रज्ञानामुळे मानवी संबंधांमध्ये होणारे बदल तसेच लोकशाही, सत्ता आणि अधिकार यांसारख्या मूलभूत प्रश्नांवरही साहित्याने भाष्य करायला हवे. स्त्री साहित्याने समाजव्यवस्थेचे विश्लेषण करावे, प्रस्थापित विचारांना प्रश्न विचारावेत आणि नव्या सामाजिक व वैचारिक शक्यतांचा मार्ग दाखवावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी साहित्य संमेलनांच्या आयोजनामागील शासनाच्या भूमिकेवर भाष्य केले. शासनाकडून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला अनुदान दिले जात होते. मात्र, मागील वर्षापासून प्रत्येक जिल्ह्यात एक साहित्य संमेलन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. साहित्य संमेलनांचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा आहे. त्या अनुषंगाने हे संमेलन महत्वाचे आहे, असे ते म्हणाले.

प्रास्ताविकात स्वागताध्यक्ष रवींद्र फडणवीस यांनी संस्थेच्या दृष्टीने या संमेलनाचे महत्त्व अधोरेखित केले. शैक्षणिक संस्था टिकवून ठेवणे आजच्या काळात कठीण झाले आहे. मराठी शाळा बंद पडत असताना आमच्या संस्था टिकून आहेत, ही समाधानाची बाब आहे, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रविणा नागपूरकर यांनी केले, तर डॉ. चंद्रशेखर गीते यांनी आभार मानले.

आज संमेलनात

२१ नोव्हेंबर रोजी महिला महाविद्यालयात

सकाळी १०.३० वाजता : 'समाजमाध्यमे : जोखीम आणि गरज' या विषयावर परिसंवाद.

दुपारी २.१५ वाजता : 'बोली साहित्यातील लेखिकांचे योगदान' या विषयावर प्रा. डॉ. काशिनाथ बऱ्हाटे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद.

दुपारी ४.१५ वाजता : प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. वसंत आबाजी डहाके यांच्या अध्यक्षतेखाली संमेलनाचा समारोप

थोडक्यात

डिफेन्स तलावावर भक्तीभावाने छट पूजा संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

आयुध निर्माणी डिफेन्स- दत्तवाडी मार्गवरील ठाकूर तलावावर आयुध निर्माणीतील हिंदी भाषी समिती च्या सहकार्याने ३ दिवसीय छटपर्व उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी छटवृत्ति भाविका ना पूजा व विधी करण्यासाठी निर्माणी प्रशासन व हिंदी भाषी समिती द्वारा उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती. छटपूजेच्या पहिल्या दिवशी १४ नोव्हेंबर ला घरीच नहाये -खाये पर्व,१५ नोव्हेंबर ला संध्याकाळी मोठ्या संख्येने उत्तर भारतीय परिवारांनी असतांचल सूर्य ला पहिला अर्घ्य, तर १६ नोव्हेंबर ला सकाळी नवीन वस्त्र धारण करून,पूजा साहित्य घेउन सहपरिवार उगवत्या सूर्य ला दुसरा अर्घ अर्पण केला.

छटपूजेचे सामूहिक गीत देखील गाण्यात आले. कार्यक्रम स्थळी यंत्र इंडिया लिमिटेड चे निदेशक तथा अतिरिक्त प्रभार सीएमडी विजयकुमार अय्यर, विशेष अतिथी निदेशक राजीव कुमार काडला,संतोष कुमार सिंहच्या हस्ते तसेच छटपूजा महोत्सव समिती संयोजक अध्यक्ष नागेंद्र प्रसाद,सचिव अरविंद तिवारी, कोषाध्यक्ष प्रकाश यादव,प्रदीप सिंह, मनीष प्रसाद, राजेश बनारसी, हिंदी भाषा समिती आयोजक अध्यक्ष बी बी सिंह उपाध्यक्ष हरिंदर प्रसाद यादव,सचिव ललित चौबे यांच्या उपस्थितीत विशेष पूजा संपन्न झाली. आयोजन समिती चे सत्येंद्रप्रसाद,मनोज यादव,अजय यादव, नीरज शुक्ला, प्रदीप यादव,गौतम कुमार,कुंदन कुमार मनीष सोनी आदि च्या सहकार्य ने विशेष प्रसादचे वितरण करण्यात आले. डिफेन्स वाडी, आठवा मैल व आसपासच्या परिसरातील हिंदी भाषिक परिवार या तलावावर मोठ्या संख्येने पूजेसाठी उपस्थित झाले होते.

पंचवीस वर्षांनंतर माजी विद्यार्थी आले एकत्र

द्रुगधामना हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन, कुटुंबीयांसह उपस्थिती



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

दवलामेटी येथील द्रुगधामना हायस्कूलच्या इयत्ता दहावी (सत्र २००१-२००२) च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा रविवार, १५ नोव्हेंबर रोजी आठवा मैल येथील शताब्दी हॉलमध्ये उत्साहात पार पडला. तब्बल २५ वर्षानंतर एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी जुन्या शालेय आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य पुरुषोत्तम कोठे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य विजय कळसाईत, माजी प्राचार्य सुरेश अरसडे यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणी व अनुभव व्यक्त केले. या सोहळ्याला ११० माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी कुटुंबीयांसह उपस्थिती लावली. तसेच शाळेच्या विकासासाठी आपापल्या स्तरावर सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

प्रास्ताविक अरुण कराळे यांनी केले. संचालन राहुल फलके यांनी तर आभार प्रज्ञा वासनिक यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नितेश मेश्राम, स्नेहल जनबंधु, वैभव तिरपुडे, हेमचंद्र पाटील, राजनीश गोलाईत, भारत गजभिये, संदीप सनकाळे, सचिन नागोसे, माधुरी टेंभरे, पंकज वासनिक, शितल ढवळे, निकेतन साठे व भाग्यशाली गजभिये यांनी सहकार्य केले.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिन उत्साहात साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षणादरम्यान न्यू अपोस्टॉलिक स्कूल, कुकडे लेआउट येथे आंतरराष्ट्रीय पुरुष दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रशिक्षणार्थ्यांच्या वतीने सर्व पुरुष सुलभकांचा सत्कार करण्यात आला. सुलभक डॉ. नरेंद्र कामडी, अंशुल जिचकार, प्रमोद बालकोटे आणि भगत यांचा आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन प्रशिक्षणार्थी आमरीन अंजुम, अंजुम शेख, वासीरा जमाल आणि सना कौसर यांनी केले होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

माधुरी चिंचाळकर यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



इतवारी भागातील प्रतिष्ठित नागरिक सौ. माधुरी चिंचाळकर यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षांचे होते. श्रीयुत प्रकाश चिंचाळकर हे सीपी अँड बेरार कनिष्ठ महाविद्यालयातील निवृत्त प्राध्यापक आहेत. त्यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, नातू, पुतणे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. उद्या दिनांक २१ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता गंगाबाई घाटावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

बालजगतमध्ये २२ नोव्हेंबरला "दीपावली स्नेहमिलन"

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : दीनदयाल शोध संस्थान, बालजगत, लक्ष्मीनगर नागपूर येथे रविवार, २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता स्वरवेद तर्फे "दीपावली स्नेहमिलन" सुमधुर हिंदी मराठी गीतांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. भारतरत्न नानाजी देशमुख व लोकमाता सुमतीताई सुकळीकर यांच्या स्मृतींना हा कार्यक्रम समर्पित राहणार आहे. कार्यक्रमाची संकल्पना रवी सातफळे यांची असून इंडियन आयडॉल फेम यशश्री भावे, सारेगम फेम निलेश सावरकर, विशाल देशपांडे, पल्लवी दामले हे गायक कलाकार विविध गीते सादर करतील. रवी सातफळे, आशिष सुपारे, श्रीकांत मारवडकर वाद्यसंगत करतील. कार्यक्रमाचे निवेदन मनोज वैद्य करणार आहेत. या विनामूल्य कार्यक्रमाला बालजगतच्या परिवारातील सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बालजगतचे अध्यक्ष अभिनंदन पळसापुरे, प्रकल्प प्रमुख अनुजा परचुरे, उपाध्यक्ष पंकज महाजन, सचिव संजय भाकरे यांनी केले आहे.

विहिरीत आढळला ३७ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह, आत्महत्येचा संशय

दोन दिवसांपासून होता बेपत्ता

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या ३७ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह शुक्रवारी (२० नोव्हेंबर) सकाळी येथील धमार्पूर परिसरातील विहिरीत आढळून आला. राष्ट्रपाल रामकृष्ण जनबंधू (रा. पंचशील चौक, भिवापूर) असे मृताचे नाव आहे. कौटुंबिक कारणातून त्यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांत दाखल तोंडी तक्रारीनुसार, राष्ट्रपाल याला दारूचे व्यसन होते. त्याची पत्नी मागील १० ते १२ वर्षांपासून माहेरी राहत होती. गुरुवारी (१९ नोव्हेंबर) सकाळी ५ वाजतापासून तो घरातून बेपत्ता होता. कुटुंबीयांनी नातेवाइकांकडे तसेच परिसरात त्याचा शोध घेतला; मात्र तो मिळून आला नाही.

शुक्रवारी सकाळी पुन्हा शोध सुरू असताना हिरालाल जनबंधू यांच्या मिरची साठवण केंद्रामागील विहिरीत एक मृतदेह तरंगताना आढळला. मृताचा चेहरा पाहून त्याचा लहान भाऊ अतुल जनबंधू यांनी ओळख पटविली. दारूच्या व्यसनामुळे आणि पत्नी दीर्घकाळ सोबत राहत नसल्याने मानसिक परिणाम होऊन राष्ट्रपाल याने विहिरीत उडी घेतली असावी, असा अंदाज त्यांच्या भावाने तक्रारीत व्यक्त केला आहे. त्याच्या मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचेही त्यांनी पोलिसांना सांगितले. या घटनेमुळे पंचशील चौक परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दिवाळी अंक हे वाचकाचे बौद्धिक खाद्य!

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात नागपूर दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नागपूर यांच्या कार्यालयात दिवाळी अंक २०२६ च्या प्रदर्शनाचे उद्घाटन १९ नोव्हेंबर करण्यात आले. जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडू यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. दिवाळी हा प्रकाशाचा, आनंदाचा आणि मांगल्याचा सण असला, तरी मराठी माणसासाठी दिवाळी म्हणजे फराळ, आकाशकंदील, पणत्या यांच्यासोबतच दर्जेदार साहित्याची मेजवानी देखील असते.

दिवाळीच्या निमित्ताने प्रकाशित होणारे दिवाळी अंक हे वाचकाचे बौद्धिक खाद्य आहेत, केवळ मनोरंजनाचे साधन नसून मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, विचार



आणि सामाजिक प्रबोधन यांचा अनमोल ठेवा आहेत. असे असे प्रतिपादन उद्घाटक संजय कडू यांनी केले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथालय भारती चे कार्याध्यक्ष आणि राज्य ग्रंथ निवड समितीचे सदस्य रवींद्र गोविंद पांडे हे उपस्थित होते. या दिवाळी अंकाच्या प्रदर्शनात महाराष्ट्रातील विविध भागातून प्रकाशित झालेले दिवाळी अंक ठेवण्यात आले आहे. या प्रदर्शनात विविध दर्जेदार अंकाचा समावेश असल्याने वाचकांसाठी ही मेजवानीच ठरणार आहे, महाराष्ट्र राज्यातील दिवाळी अंकाची समृद्ध परंपरा जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या कार्यालयाने टिकवून ठेवण्याचा चांगला प्रयत्न केला आहे असे रवींद्र गोविंद पांडे यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी यांनी ग्रंथालयबाबत माहिती देऊन या ग्रंथालयाचे वर्गणीदार सभासद व्हावे असे आवाहन केलेत, दिवाळी अंक प्रदर्शनात विविध विषयावरील १०० हून अधिक दिवाळी अंक.. किशोर, मुलांचे मासिक, मौज मिडिया वाच, दीपावली, हंस, ललित, गृहलक्ष्मी, ग्रंथ भारती, विनोदी, माहेर, आवाज, जत्रा, ग्रह्मीत, उपलब्ध आहेत हे प्रदर्शन १९ ते २५ नोव्हेंबर पर्यंत शासकीय सुट्टया वगळता सर्वांसाठी निशुल्क खुले राहणार आहे. आभार प्रदर्शन सुर्यकांत भोसले यांनी केले.

या कार्यक्रमाला ग्रंथालय भारती चे केंद्रीय कोषाध्यक्ष वामन निचंते, सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटनेचे नेते नंदू बनसोड, प्रमोद रोडे, शांताराम लाखे तसेच कार्यालयीन कर्मचारी वर्ग आणि वाचक, विध्यार्थी उपस्थित होते.

ओबीसी विद्यार्थ्यांना पदवीपर्यंत मोफत शिक्षण द्या; स्पर्धा परीक्षांचे शुल्कही कमी करा!

आमदार अभिजित वंजारी यांना निवेदन, विधिमंडळात प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासन

दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

श्री संताजी अखिल तेली समाज संघटन महाराष्ट्र राज्याच्या वतीने नागपूर पदवीधर मतदारसंघाचे नवनियुक्त विधानपरिषद आमदार अभिजित वंजारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ओबीसी विद्यार्थ्यांना पदवीपर्यंत मोफत शिक्षण देण्यात यावे तसेच स्पर्धात्मक परीक्षांचे परीक्षा शुल्क कमी करण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करण्यासंदर्भात त्यांना निवेदन देण्यात आले. दत्तात्रयनगर, छोटा ताजबाग येथील त्यांच्या



कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला.

निवेदनात म्हटले आहे की, देशातील ओडिशा व केरळ या राज्यांमध्ये राज्य सरकारच्या माध्यमातून पदवीपर्यंत मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाराष्ट्रातही काही अटींच्या अधीन राहून मुलींना पदवीपर्यंत मोफत शिक्षण दिले जात आहे. मात्र, भारतीय संविधान समानतेचा आणि भेदभावविरहित वागणुकीचा पुरस्कार करते. त्यामुळे लिंगभेद न करता मुलांनाही पदवीपर्यंत मोफत शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी.

विशेषतः ओबीसी प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, शिक्षणाचे प्रमाण वाढावे आणि राज्याच्या तसेच देशाच्या विकासात त्यांचे योगदान वाढावे, यासाठी ही मागणी महत्त्वपूर्ण असल्याचे संघटनेने नमूद केले.

तसेच ओबीसी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे स्पर्धा परीक्षांचे परीक्षा शुल्क कमी करण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली. या दोन्ही विषयांवर आमदार अभिजित वंजारी यांनी महाराष्ट्राच्या विधिमंडळात आवाज उठवावा, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली.

यावेळी आमदार अभिजित वंजारी यांनी निवेदन स्वीकारून या विषयावर विधिमंडळात चर्चेसाठी प्रश्न उपस्थित करण्याबाबत सकारात्मक आश्वासन दिले.

दरम्यान, 'जोडी संत तुकाराम संताजीची' या चित्रपटाचे पुणे येथील दिग्दर्शक तथा निर्माते श्री. व सौ. चौधरी यांचे आमदार अभिजितदादा वंजारी यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी संघटनेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

संताजी तेली समाज संघटनेची मागणी

या प्रसंगी संघटनेचे संस्थापक अनिल बजाईत, विभागीय अध्यक्ष रामेश्वर वाडीभस्मे, शहराध्यक्ष संजय मेहेर, सल्लागार मोतीराम शहारे, कांचनताई माकडे, कन्हान शहर महिला अध्यक्ष सुनीता मानकर, हिंगणा तालुकाध्यक्ष अरुण कैकाडी, माजी पोलीस उपनिरीक्षक दीपक अवचट, नागपूर जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम पिसे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सूर्यभान चकोले, मोरेश्वर नरड, वसंता राडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांसाठी आणि समान संधींसाठी संघटनेने केलेला हा पुढाकार महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

थोडक्यात

निरोगी जीवनशैली व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत टायगर सिटी सायकल वारी धापेवाडाकडे रवाना होणार रविवारी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

टायगर सिटी सायकलिंग असोसिएशनच्या वतीने रविवार, २२ नोव्हेंबर रोजी, सकाळी ६.३० वाजता ऑरेंज सिटी चौक, खामला येथे एक सायकलच्या प्रतिकृतीसाठी शिवानी दाणी - वखरे यांच्या हस्ते भूमिपूजन झाल्यावर नागपूर ते धापेवाडा सायकल वारीला प्रारंभ होणार आहे. या वारीत खुद्द सुश्री शिवानी या भाग घेणार आहेत. या सायकल वारीत नागपूर व विदर्भातील सायकलप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. सायकलिंगचा प्रसार, निरोगी जीवनशैलीचा स्वीकार, पर्यावरण संवर्धन तसेच धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचा संगम घडविण्याच्या उद्देशाने या वारीचे आयोजन करण्यात आले आहे.

सायकलिंग ही केवळ व्यायामाची पद्धत नसून प्रदूषणमुक्त पर्यावरण, आरोग्य आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारी चळवळ असल्याचे आयोजकांनी सांगितले. या वारी दरम्यान धापेवाडा येथील श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदिरात दर्शन, आरती व रिंगण कार्यक्रम होईल. रिंगण डॉ. आशिष देशमुख, टछअ सावनेर - कळमेश्वर यांच्या उपस्थितीत होणार आहे. यात सहभागी होण्याची संधी सायकल प्रेमींना मिळणार आहे. नागपूरसह विदर्भातील सायकल प्रेमींनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन टायगर सिटी सायकलिंग असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे जयंत मेंढी, दिलीप वरकड आणि धरमपाल फुलझेले यांनी कळविले आहे.

काटोल येथे कामगार रुग्णालय सुरू करण्याची तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनची मागणी, आ. ठाकूर यांना निवेदन

दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

काटोल व नरखेड तालुक्यातील महावितरणच्या कंत्राटी कामगारांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना एरव्ह अंतर्गत वैद्यकीय



सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी काटोल येथे ईएसआयसी दवाखाना सुरू करण्याची मागणी तांत्रिक कामगार युनियन (५०५९) प्रणित तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशन (७२८) च्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात काटोल विधानसभा क्षेत्राचे आमदार चरणसिंग ठाकूर यांना निवेदन देण्यात आले. महावितरण अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांच्या वेतनातून नियमितपणे एरव्ह चे योगदान कपात केले जाते. मात्र, काटोल परिसरात एरव्ह दवाखान्याची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांना उपचारासाठी नागपूर किंवा इतर दूरच्या ठिकाणी जावे लागते.

विशेषत: विद्युत क्षेत्रातील जोखमीचे काम करताना अपघात किंवा आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने उपचार मिळण्यात अडचणी निर्माण होतात.त्यामुळे काटोल शहरात स्वतंत्र ईएसआयसी दवाखाना सुरू करावा, दवाखाना सुरू होईपर्यंत ईएसआयसी संलग्न रुग्णालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना मोफत वैद्यकीय उपचार, औषधे आणि आवश्यक तपासण्यांची सुविधा मिळावी, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. यावेळी उकेश चौहान, जिल्हा नियोजन समिती सदस्य आणि विक्की भा. कावळे, राज्य कार्याध्यक्ष, तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशन (७२८) उपस्थित होते.

प्रकाशनगर उद्यानात रविवारी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर

खासदार मायाताई इवनाते व आमदार विकास ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन; विविध आरोग्य तपासण्यांसह अवयवदानाबाबत मार्गदर्शन

दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

कॅनरा बँकेच्या दाभा शाखेला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या औचित्याने मॅक्स हॉस्पिटल, मानकापूर आणि कॅनरा बँक, दाभा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २२ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रकाशनगर उद्यान, प्रकाशनगर, दाभा येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत हे शिबिर पार पडणार आहे.

या शिबिरात परिसरातील नागरिकांसाठी ब्लड शुगर, ब्लड प्रेशर, बीएमआय (इटक), बोन डेन्सिटी, नेत्र तपासणी, कॅल्शियम, कोलेस्ट्रॉल आणि युरिक ॲसिड यांसह विविध आरोग्य तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून अवयवदानाचे महत्त्व आणि महिलांमधील स्तनाच्या कर्करोगाबाबत जनजागृती व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आरोग्य शिबिरासोबतच नागरिकांना कॅनरा बँकेच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात येणार असून, इच्छुकांना शून्य शिल्लक (झिरो बॅलन्स) खाते उघडण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शिबिराचे उद्घाटन राज्यसभा खासदार मायाताई इवनाते आणि पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी नगरसेविका साधनाताई बर्डे, नगरसेविका दर्शनीताई धवड आणि नगरसेवक विक्रम ग्वालवंशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या उपक्रमाचे आयोजन प्रकाशनगर वसाहत, शुभारंभ सोसायटी आणि कृषीनगर रहिवासी समिती यांच्या संयुक्त सहकार्याने करण्यात आले आहे. परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक प्रशांत शेवरावजी अनासने (विशेष कार्यकारी अधिकारी, दाभा), संयोजक आदित्य अंबाडेकर, प्रमुख सल्लागार बाळासाहेब आंबडेकर, अरुण वानखेडे, यादवराव कोठे, नागराज कोरे तसेच समस्त रहिवासी समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

ख्वाहिश नहीं मुझे मशहूर होने की...

ज्येष्ठ पत्रकार कमलाकर धारप यांना सन्मान 'भला माणूस पुरस्कार २०२६' प्रदान



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'ख्वाहिश नहीं मुझे मशहूर होने की, आप मुझे पहचानते हो, बस इतना ही काफी है' या मुन्शी प्रेमचंद यांच्या कवितेतील ओळींचा उल्लेख करत ज्येष्ठ पत्रकार कमलाकर धारप यांनी प्रसिद्धीपेक्षा माणसांच्या मनात आपले निर्माण झालेले स्थान अधिक महत्त्वाचे असे सांगत, आपल्या भावना व्यक्त केल्या. कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित देवीलाल जयस्वाल 'भला माणूस पुरस्कार २०२६' सोहळ्यात ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन कमलाकार धारप यांचा गौरव करण्यात आला. यावेळी त्यांच्या 'माझे जीवनगाणे'या आत्मकथनपर पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले.

शुक्रवारी चिटणवीस सेंटर येथे झालेल्या या कार्यक्रमात ९४ वर्षे वय असलेले कमलाकार धारप यांनी उभे राहून खणखणीत आवाजात भाषण केले. या वयातही कार्यमग्न असलेले धारप म्हणाले, माज्यातील कथाकाराची संवेदनशीलता पत्रकारितेतही कायम राहिली. आई-वडिलांकडून मिळालेले संस्कार आणि नम्रतेची भावना यामुळेच मी अहंकारापासून दूर राहू शकलो. कदाचित याच भावनेमुळे मला हा पुरस्कार मिळाला असावा.

हा पुरस्कार माझ्यासाठी प्रतीकात्मक स्वरूपाचा आहे. समाजातून चांगुलपणा लोप पावत असताना भलेपणाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा कृषी विकास प्रतिष्ठानचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये भलेपणा असतो, असे सांगताना त्यांनी जीवनातील प्रत्येक लढाईत विवेकाचा वापर ब्रह्मास्त्राप्रमाणे प्रभावी ठरतो. आपले नाव कोणत्या कामासाठी ओळखले जावे, हे प्रत्येकाने आपल्या कृतीतून ठरवायचे असते, उद्गार काढले.

पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रदीर्घ काळ निष्ठेने आणि अहंकारविरहित वृत्तीने कार्य करणारे कमलाकर धारप हे सज्जनपणा आणि भलेपणाचे आदर्श उदाहरण आहेत. वयाच्या ९४ व्या वर्षीही त्यांचा उत्साह, कामाप्रती असलेली निष्ठा आणि अद्ययावत राहण्याची वृत्ती प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार डॉ. रवींद्र शोभणे यांनी काढले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब कुळकर्णी म्हणाले, धारप यांच्या मार्गदर्शनाखाली २५ वर्षे काम करण्याची संधी मला मिळाली. त्यांनी माझे बोट धरून पत्रकारिता शिकवली आणि माझे आयुष्य समृद्ध केले. हाताखाली काम करणाऱ्यांना घडविण्याचे मोठे काम त्यांनी केले. त्यांनी अनेकांना मोठे केले.

कृषी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रास्ताविकातून डॉ. गिरीश गांधी यांनी पुरस्कारामागील भूमिका विशद केली. स्व. देवीलालजी जयस्वाल यांच्या दानशूरपणासह त्यांच्या विविध गुणांचा त्यांनी उल्लेख केला. धारप हे तपस्वी पत्रकार आहेत, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

प्रदीप मैत्र यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा दंडिगे-घिया यांनी केले. आभार प्रदर्शन निलेश खांडेकर यांनी केले.

मंचावर कृषी विकास प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्रीराम काळे व अरुण वानखेडे यांची उपस्थिती होती तर कार्यक्रमाला विशाल जयस्वाल व कुटुंबीय, जयप्रकाश गुप्ता, मोरेश्वर बडगे, विलास मानेकर, संदीप बारस्कर, भाग्यश्री बारस्कर, निशांत गांधी, अरुणा सबाने, प्रदीप आगलावे, श्रीकृष्ण चांडक, धनश्री देशपांडे, अपरूप अडवाडकर यांच्यासह पत्रकारिता, साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

'खासदार शिव किल्ले स्पर्धे'चा २२ नोव्हेंबर रोजी बक्षीस वितरण सोहळा

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने दिवाळीच्या पर्वावर आयोजित करण्यात आलेल्या 'खासदार शिव किल्ले स्पर्धा - २०२६' चा बक्षीस वितरण सोहळा रविवार, २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता क्रीडा चौकातील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बास्केटबॉल ग्राउंडवर आयोजित करण्यात आला आहे. या बक्षीस वितरण सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून सर्व आमदार, कृष्णा खोपडे,मोहन मते, प्रवीण दटके आणि राजे मुधोजी भोसले यांचीही उपस्थिती लाभणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा गौरवशाली इतिहास, शौर्य आणि स्थापत्यवैभव नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित या स्पर्धेत शहरातील शालेय व खुल्या गटांतर्गत १२५ हून अधिक गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती सहभागी झाल्या होत्या.

बक्षिस वितरण सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्पर्धेचे संयोजक अतुल गुरू, सहसंयोजक संजय बंगाले यांच्यासह खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी यांच्यासह सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

दीक्षाभूमी ते संविधान चौक 'वॉक फॉर संविधान'चे आयोजन!

वाडीकर होणार सहभागी; विविध सामाजिक संघटनांचे उपक्रमाला समर्थन

दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

भारतीय संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर रोजी राज्यासह देशभरात संविधान जागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. याच पार्श्वभूमीवर नागपूर येथील सामाजिक संस्था ग्रेंज्युएट फोरमच्या वतीने मागील सात वर्षांपासून संविधानाचे महत्त्व, संविधानिक मूल्ये आणि संविधानाबाबतची जनजागृती घराघरांत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'वॉक फॉर संविधान' या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. वंदादी २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता दीक्षाभूमी परिसरातील अण्णाभाऊ साठे चौक येथून संविधान चौकापर्यंत भव्य 'वॉक फॉर संविधान' रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती वाडी पत्रकार संघाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ग्रेंज्युएट फोरमचे पदाधिकारी तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य राहुल हनवते आणि आयोजक धम्मानंद मनवर यांनी दिली.

यावेळी आयोजकांनी सांगितले की, सकाळी ७ वाजता अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विशेष अतिथींच्या उपस्थितीत रॅलीला सुरुवात होईल. या रॅलीमध्ये महापुरुषांची वेशभूषा केलेले कलावंत, खेळाडू, विद्यार्थी तसेच संविधानप्रेमी नागरिकांसह हजारो अनुयायी सहभागी होणार आहेत. या उपक्रमाला दरवर्षी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. संविधान जागृती आणि देशभक्तीचा संदेश देणारा ग्रेंज्युएट फोरमचा हा उपक्रम प्रशंसनीय असल्याचे मत व्यक्त करीत वाडी परिसरातील विविध सामाजिक संघटनांनी या रॅलीला समर्थन जाहीर केले आहे. यामध्ये श्री संताजी तेली समाज संघटनेचे अध्यक्ष अनिल बाजाईत, दीपक अवचट, मोतीराम शहारे, बी.सी. ?थलेटिक क्लबचे संस्थापक संचालक भारत चोखद्रे, शिवराजे ढोल-ताशा पथकाचे प्रमुख शुभम डवरे, तोषित अंबाडकर, धम्मकीर्ती नगरच्या वतीने डॉ. शंभरकर, अशोक बागडे, अस्मिता मंचचे अशोक घरडे, वाडी पत्रकार संघाचे सचिव विजय वानखडे तसेच सामाजिक समता मंच आदींनी या उपक्रमाचे कौतुक करून सक्रिय समर्थन दर्शविले आहे. या संविधान जागृती उपक्रमात वाडी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतील, असा विश्वासही सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केला.

संविधानिक मूल्यांचा जागर आणि देशभक्तीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात वाडी, हिंगणा तसेच नागपूर परिसरातील सर्व संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

महावितरणचा वीजचोरांना दणका, राज्यभरात तीन दिवसात २५० वीजचोरीची प्रकरणे उघड

६ कोटी २७ लाख रुपयांच्या वीजचोरीचा सुरक्षा व अंमलबजावणी विभागाकडून पर्दाफाश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाने राज्यात अवघ्या तिनच दिवसात राबविलेल्या वीज चोरी मोहीमेत वीज चोरी व अनधिकृत वीज वापराची २५० प्रकरणे उघडकीस आली आहेत. या कारवाईत ६ कोटी २७ लाख रुपयांच्या वीजचोरीचा पर्दाफाश करण्यात आला असून कारवाईमुळे वीज चोरांचे धाबे दणाणले आहे.

वीजचोरी आणि महसूल गळती रोखण्यासाठी भरारी पथकांच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. राज्यातील कोकण, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या प्रादेशिक परिक्षेत्रात सुरक्षा व अंमलबजावणी विभागाकडून तपासणी करण्यात आली. यामध्ये कोकण प्रादेशिक विभागात५३, पुणे ७३, छत्रपती संभाजीनगर ५६ आणि नागपूर प्रादेशिक विभागात ६८ अशा एकूण २५० वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली. वीज चोरी प्रकरणांचे मुल्यांकन झाले असून ६ कोटी २७ लाख रूपयांच्या वीज चोरीचे बिल संबंधित ग्राहकांना देण्यात आले आहे. वीज चोरीचे देयक व दंडाचा भरणा न केल्यास गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या मोहिमेत २४० ग्राहकांविरुद्ध विदयुत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तर कलम १२६ नुसार अनधिकृत वीज वापर प्रकरणी दोषांविरुद्ध कारवाई करण्यात आली. वीजचोरीचे देयक व दंडाच्या रकमेचा विहित मुदतीत भरणा न करणाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी फिर्याद देण्यात येणार आहे. वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी दंड व तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी सुरू आहे. वीज ग्राहकांनी अधिकृत वीज जोडणी घेवूनच विजेचा वापर करण्याचे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र व सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या कार्यकारी संचालक अपर्णा गिते यांनी केले आहे.

कोराडी मंदिराच्या अन्नछत्रातील म्हैसूर पाक प्रकरणाशी संस्थानाचा थेट संबंध नाही, मंदिर प्रशासनाचे स्पष्टीकरण

दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी



श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानच्या अन्नछत्रातील म्हैसूर पाकच्या नमुन्याबाबत अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईनंतर मंदिर प्रशासनाने अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. संबंधित म्हैसूर पाक अन्नछत्रात तयार करण्यात आलेला नसून, बाहेरील विक्रेत्यामार्फत तयार स्वरूपात प्रसाद म्हणून आणण्यात आला होता, असे संस्थानने स्पष्ट केले आहे.

सदर म्हैसूर पाकमध्ये सजावटीसाठी वापरण्यात आलेल्या खाद्य रंगाचे प्रमाण निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आढळल्याने अन्न व सुरक्षा विभागाने संबंधित कंत्राटदाराच्या परवान्याच्या निलंबनाची कारवाई केली आहे.

ही कारवाई संबंधित कंत्राटदाराच्या परवान्याशी निगडित असून, मंदिराच्या अन्नछत्रातील नियमित भोजन व्यवस्थेशी त्याचा संबंध नसल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. मंदिराच्या अन्नछत्रात म्हैसूर पाक तयार केला जात नसून, भाविकांसाठी दररोज ताजे व सात्त्विक भोजन तयार केले जाते. यामध्ये भाजी, पोळी, वरण, भात आणि गोड पदार्थ म्हणून शिऱ्याचा समावेश असतो. भोजनाची गुणवत्ता आणि स्वच्छता यांना संस्थानाकडून प्राधान्य दिले जाते, असेही स्पष्ट करण्यात आले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मंदिर प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराविरुद्ध आवश्यक प्रशासकीय कारवाई केली आहे. दरम्यान, संबंधित कंत्राटदाराने एफडीएच्या कारवाईविरोधात आयुक्तांकडे नियमानुसार अपील दाखल केले असून, त्याची प्रक्रिया सुरू आहे.

एका विशिष्ट बाहेरून आणलेल्या अन्नपदार्थाच्या नमुन्याबाबत झालेल्या कारवाईचा संबंध संपूर्ण अन्नछत्राच्या भोजन व्यवस्थेशी जोडणे योग्य नसल्याचे संस्थानाने नमूद केले आहे. वस्तुस्थितीची पूर्ण माहिती न घेता बातम्या प्रसारित केल्याने संस्थानाची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता असल्याचेही प्रशासनाने म्हटले आहे.

भाविकांच्या आरोग्याशी आणि अन्नाच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. प्रसारमाध्यमांनी संपूर्ण वस्तुस्थिती जाणून घेऊनच बातम्या प्रसारित कराव्यात तसेच भाविकांनी अपुऱ्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी मंदिर प्रशासनाने केले आहे.

थोडक्यात

ग्रा.पं.तुमान येथे मंडईनिमित्त लावणी सम्राज्ञी निधी पुणेकर यांचा सरपंच धम्मजीत गजभिये यांच्या हस्ते सत्कार



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

ग्रा पं तुमान येथे मंगळवार (ता. १७ नोव्हेंबर)ला आयोजित मंडई कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच धम्मजीत गजभिये यांच्या हस्ते करण्यात आले व यानिमित्त आयोजित सांस्कृतिक लावणीचा कार्यक्रम सादर करणाऱ्या सुप्रसिद्ध लावणी सम्राज्ञी निधी पुणेकर यांच्या सरपंच गजभिये यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे वंदाही मंडई निमित्त तुमान गावाला जत्रेचे स्वरूप आलेले होते.

याप्रसंगी माजी आमदार मालिकार्जुन रेड्डी, माजी जि प सदस्य कैलास बरबटे, सरपंच धम्मजीत गजभिये, प्रल्हाद रंधई, पुरुषोत्तम राऊत, दुर्गेश घोडमारे, प्रमोद बरबटे, विकास चौधरी, दिपक गायकवाड, मनोहर चौधरी, शरनाथ सोनवाने,शुभम पटिये,भुषण रंधई,सचिन गजबे, प्रज्वल शिंगने,नितीन चौधरी, आशीष चौधरी,रवि भिवगडे, प्रशांत चौधरी,अमीत शेरकूरे,रितेश चौधरी,कार्तिक घोडमारे,वैभव घोडमारे,सुमीत कुंभरे,अतूल भोयर,सौरभ राऊत, अनिकेत चौधरी,विपुल रंधई सह गावातील परिसरातील तालुक्यातील व जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथी निमित्त मौदा येथे आनंदाच्या शिधाचे वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री,शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे व महाराष्ट्राचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या संकल्पनेतून मौदा शहरातील गरजू दिव्यांग नागरिकांना आनंदाचा शिधा वाटप कार्यक्रम मंगळवार(ता. १७ नोव्हेंबर)ला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पुण्यतिथी निमित्त शिवसेना मध्यवर्ती कार्यालय,मौदा येथे आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजकुमार घुले व शिवसेना मौदा तालुकाप्रमुख नितेश वांगे यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला.

यावेळी माजी तालुकाप्रमुख सदुकर हटवार,युवासेना मौदा तालुकाप्रमुख रूषभ बावणे, मौदा विविध सेवा सहकारी सोसायटी संचालक रामप्रसाद पराते,शहर संघटिका वंदना बुराडे,उपसरपंच उमेश भोतमांगे,युवासेना पंचायत समिती सर्कल प्रमुख स्वप्नील भोयर,युवासेना शाखाप्रमुख अभि बडे,बंडू तिवाडे,सुहास वासनिक,निखिल राऊत व पदाधिकारी,शिवसैनिक, गरजू दिव्यांग नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठी फिल्म फेस्टिवलचे आज उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनच्या वतीने व्हीआयपी रोडवरील वनामती सभागृहात आयोजित दोन दिवसीय मराठी फिल्म फेस्टिवलचे उद्घाटन शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ११.४५ वाजता प्राप्तिकर आयुक्त संदीपकुमार साळुंके यांच्या हस्ते होत आहे. यावेळी मुख्यमंत्री सचिवालयातील सहसचिव आशा पठाण (आयएएस) महानगरपालिका स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी वखरे यांच्यासह चित्रपटांचे निर्माते व दिग्दर्शक शैलेश नरवडे, मंगेश बदर, राज मोरे, रोहन कानवडे, विजय कळमकर, उमेश बागडे, विनोद कांबळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

एनएफडीसी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर महानगरपालिका, सपकं आणि सिने मोंटाज यांच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवात पहिल्या दिवशी महोत्सवाच्या पहिल्या दिवशी दुपारी १२.१० वाजता गाजलेल्या 'जयंती-२' या चित्रपटाने चित्रपट प्रदर्शनाला सुरुवात होईल. त्यानंतर 'मदार' आणि 'खालिद के शिवाजी' हे चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार आहेत. संबंधित चित्रपटांचे निमार्ते व दिग्दर्शकांशी थेट संवाद साधण्याची संधीदेखील चित्रपटप्रेमींना मिळणार आहे. महोत्सवात प्रवेश विनामूल्य राहणार असून नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि चित्रपटप्रेमींनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

संजय बाबाराव भीलकर यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सदभावना नगर प्लॉट नं. ६२, झिंगाबाई टाकली येथील रहिवासी संजय बाबाराव भीलकर यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी हृदय



विकाराच्या झटक्याने आकस्मित निधन झाले. महाराष्ट्र राज्य परिट (धोबी) समाजाचे प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी (ओबीसी) विभाग उपाध्यक्ष संत गाडगेबाबा यूथ फॉउंडेशन राष्ट्रीय अध्यक्ष यांचे उद्या २१ नोव्हेंबर रोजी, शनिवारी सकाळी १० वाजता. राहत्या घरुन मानकापुर घाटावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली व आई वडील असा बराच मोठा परिवार आहे.

वैधमापन शास्त्र विभागात तक्रारींच्या महत्त्वपूर्ण कागदपत्रांची गहाळ होण्याची धक्कादायक बाब!

नागपूर सहनियंत्रक कार्यालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; ६० ते ७० महत्त्वाची कागदपत्रे गायब झाल्याचा तक्रारदाराचा आरोप, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या वैधमापन शास्त्र विभागाच्या नागपूर विभागातील प्रशासकीय कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. नागपूर सहनियंत्रक वैधमापन शास्त्र विभाग, उपनियंत्रक वैधमापन शास्त्र नागपूर ग्रामीण तसेच कामठी विभाग क्रमांक २ येथील निरीक्षकांच्या कार्यपद्धतीसंदर्भात करण्यात आलेल्या गंभीर तक्रारींची महत्त्वपूर्ण कागदपत्रेच गहाळ झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या आयुक्तांनी वेळोवेळी दिलेले आदेश, तक्रार अर्ज, पुरावे, सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेली कागदपत्रे आणि कार्यालयीन पत्रव्यवहार यांचाही समावेश असल्याचा तक्रारदाराचा दावा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन वाहन काट्यांच्या पडताळणी व मुद्रांकनासाठी संबंधित परवानाधारकाने नियमानुसार अर्ज दाखल केले होते. मात्र, कामठी विभाग क्रमांक २ येथील संबंधित निरीक्षकांनी वारंवार विविध कारणे देत हे अर्ज नाकारल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणात निरीक्षकांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेत तक्रारदाराने नागपूर सहनियंत्रक कार्यालयाकडे लेखी तक्रारी केल्या होत्या. तसेच संबंधित निरीक्षकांविरुद्ध राज्य लोकसेवा हक्क आयोगाकडेही दाद मागण्यात आली होती.

या तक्रारींच्या अनुषंगाने आयोगाच्या आयुक्तांकडून वेळोवेळी आदेश देण्यात आले होते. तक्रारींसोबत सुमारे ६० ते ७० महत्त्वाची कागदपत्रे, पुरावे, अर्ज, कार्यालयीन पत्रव्यवहार आणि सुनावणीसंबंधित दस्तऐवज उपलब्ध होते. मात्र, आता या सर्व कागदपत्रांचा कार्यालयीन अभिलेखात शोध लागत नसल्याचे समोर आल्याने संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कार्यालयात कागदपत्रे नाहीत, अधिकृत ई-मेलमधील मेलही डिलीट?

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणातील कागदपत्रांबाबत नागपूर सहनियंत्रक कार्यालयात प्रत्यक्ष विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांकडून मुख्यालयात या प्रकरणाशी संबंधित कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. एवढेच नव्हे, तर या तक्रारींसंदर्भातील बहुतांश अर्ज व कागदपत्रे सहनियंत्रक कार्यालयाच्या अधिकृत ई-मेलवर पाठविण्यात आली होती. त्याबाबत विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी ई-मेलमधील सर्व मेल डिलीट झाल्याचे सांगितल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

हा प्रकार केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाचा आहे की महत्त्वाचे पुरावे उपलब्ध होऊ नयेत यासाठी जाणीवपूर्वक कागदपत्रे हटविण्यात आली आहेत, असा गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहे. अर्थात, ई-मेल डिलीट होण्यामागील नेमके कारण आणि त्यास जबाबदार व्यक्ती कोण, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

माहिती अधिकारातही समाधानकारक उत्तर नाही!

या संपूर्ण प्रकरणातील सत्यता समोर आणण्यासाठी तक्रारदाराने माहिती अधिकार कायद्यांतर्गत संबंधित कागदपत्रांची मागणी केली. मात्र, सहनियंत्रक कार्यालयाने माहिती अधिकाराचा अर्ज नागपूर ग्रामीण येथील उपनियंत्रक कार्यालयाकडे वर्ग केला. त्यानंतर प्राप्त झालेल्या उत्तरामध्ये आवश्यक कागदपत्रांच्या प्रती देण्याऐवजी एका साध्या कोऱ्या कागदावर काही मजकूर लिहून उत्तर देण्यात आल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

प्रत्यक्षात या प्रकरणाशी संबंधित ६० ते ७० महत्त्वाची कागदपत्रे उपलब्ध असणे अपेक्षित असताना त्यापैकी एकाही महत्त्वाच्या दस्तऐवजाची व्यवस्थित प्रत मिळालेली नसल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. यामुळे माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविण्यात आलेली माहिती नेमकी कुठे अडकली आहे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. या माहिती अधिकाराच्या उत्तरांविरोधात प्रथम अपीलसुद्धा दाखल करण्यात आले आहे. मात्र, अद्याप अपील सुनावणीची तारीख देण्यात आलेली नसल्याचे तक्रारदाराने सांगितले आहे.

दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न तर नाही ना?

तक्रारदाराने केलेल्या आरोपानुसार, कामठी विभाग क्रमांक २ येथील संबंधित निरीक्षकांच्या कार्यपद्धतीविषयी यापूर्वीही गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले होते. काही परवानाधारक व्यापाऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून विशिष्ट व्यापाऱ्यांचीच कामे प्राधान्याने केली जात असल्याचेही आरोप वारंवार करण्यात आले आहेत. या आरोपांची स्वतंत्र चौकशी होणे गरजेचे आहे.

विशेष म्हणजे, ज्या अधिकाऱ्यांच्या कामकाजा विरोधात तक्रारी करण्यात आल्या, त्याच तक्रारींच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेले पुरावे आणि आयोगाचे आदेश आता कार्यालयात उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येत असल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

जर एखाद्या शासकीय कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारी, आयोगाचे आदेश, सुनावणीची कागदपत्रे आणि अधिकृत ई-मेलवरील पत्रव्यवहारच सुरक्षित ठेवला जात नसेल, तर सामान्य नागरिक आणि परवानाधारक व्यापाऱ्यांनी न्याय कोणाकडे मागायचा, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी

या संपूर्ण प्रकरणाची महाराष्ट्र शासनाच्या वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. विशेषतः खालील बाबींची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे.

१. नागपूर सहनियंत्रक कार्यालयातील संबंधित तक्रार अर्ज, पुरावे आणि राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या आदेशांची मूळ कागदपत्रे कुठे आहेत?

२. सुमारे ६० ते ७० महत्त्वाची कागदपत्रे कार्यालयीन अभिलेखातून कशी गायब झाली?

३. अधिकृत ई-मेलवरील तक्रारी आणि पत्रव्यवहार कोणी, केव्हा आणि कोणत्या कारणाने डिलीट केला?

४. डिलीट झालेल्या ई-मेलचा सर्व्हर बॅकअप, मेल लॉग आणि रिकव्हरी तपासण्यात आली आहे का?

५. राज्य लोकसेवा हक्क आयोगाच्या आयुक्तांनी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी झाली की नाही?

६. संबंधित वाहन काट्यांच्या पडताळणी व मुद्रांकनाचे अर्ज कोणत्या नियमांच्या आधारे नाकारण्यात आले?

७. माहिती अधिकार अर्जावर अपूर्ण माहिती देण्यास जबाबदार कोण?

८. कागदपत्रे गहाळ होण्यामागे प्रशासकीय निष्काळजीपणा आहे की जाणीवपूर्वक पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न, याची चौकशी झाली आहे का?

शासकीय कार्यालयातील कागदपत्रे ही कोणत्याही अधिकाऱ्याची वैयक्तिक मालमत्ता नसून ती शासनाची अधिकृत अभिलेखीय संपत्ती आहे. त्यामुळे अशा कागदपत्रांची सुरक्षितता, जतन आणि उपलब्धता राखण्याची जबाबदारी संबंधित कार्यालयीन अधिकाऱ्यांची असते.

आता शासनानेच उत्तर द्यावे!

वैधमापन शास्त्र विभाग हा सर्वसामान्य ग्राहक, शेतकरी, व्यापारी आणि उद्योगांच्या दैनंदिन व्यवहारांशी निगडित अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. अशा विभागात तक्रारींची दखल घेण्याऐवजी तक्रारींची कागदपत्रेच गहाळ होत असतील, तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. तक्रारदाराने या प्रकरणात माहिती अधिकारांतर्गत प्रथम अपील दाखल केले असून, वरिष्ठ प्रशासकीय यंत्रणेने तातडीने हस्तक्षेप करून सर्व मूळ अभिलेख, अधिकृत ई-मेलचा बॅकअप, पत्रव्यवहार आणि आयोगाचे आदेश सुरक्षित ठेवण्याची आवश्यकता आहे.

दोषी कोणताही अधिकारी असो, त्याची जबाबदारी निश्चित झालीच पाहिजे. कागदपत्रे गहाळ होण्यामागील सत्य जनतेसमोर आले पाहिजे आणि संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी तक्रारदाराकडून करण्यात येत आहे.

नागपूर विभागातील वैधमापन शास्त्र विभागाच्या या संपूर्ण प्रकरणाकडे आता राज्याचे वरिष्ठ अधिकारी आणि शासन कोणत्या दृष्टिकोनातून पाहतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

'डेअरडेव्हिल' विजयालक्ष्मी यांचा सीएसी ऑलराऊंडरतर्फे सत्कार

वयाच्या ६२व्या वर्षी ३ हजार किलोमीटरची सायकल यात्रा करून पोहोचल्या नागपुरात



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

आंध्र प्रदेशातील भीमावरम येथून नवी दिल्लीपर्यंत सुमारे ३ हजार किलोमीटरचा सायकल प्रवास करीत नशामुक्त भारताचा संदेश जनमानसात पोहोचवण्यासाठी वयाच्या ६२ वर्षी निघालेल्या श्रीमती आय. विजयालक्ष्मी यांचा सीएसी ऑलराऊंडरतर्फे सत्कार करण्यात आला.

२२ ऑक्टोबर २०२६ रोजी आय. विजयालक्ष्मी यांनी ही साहसी सायकल मोहिम दिल्ली येथून सुरू केली. या सायकल मोहिमेदरम्यान त्या देशभरातील तरुणांना व्यसनांपासून दूर राहून निरोगी आणि सकारात्मक जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन करीत आहेत.

आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतील प्रवास पूर्ण केल्यानंतर त्या महाराष्ट्रात दाखल झाल्या असून, शुक्रवारी त्या नागपुरात आल्या. संचेती स्कूलमध्ये त्यांचा सीएसी ऑलराऊंडरचे संचालक अमोल खंते यांनी स्वागत व सत्कार केला. या भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. यावेळी त्या आपल्या सायकल मोहिमेचा उद्देश, प्रवासातील अनुभव आणि व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

यावेळी उपप्राचार्य शीतल कठाळे, डमिन हेड डॉ. प्रवीण कौर, मिताली वेलदे व अमित येनूरकर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

आज कोदामेंढी व खात या दोन जि.प.सर्कलमध्ये पालकमंत्री तथा महसूल मंत्री यांच्या दीपावली मिलन कार्यक्रम अंतर्गत गाव भेट दौरा

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा

कोदामेंढी-अरोली जि प क्षेत्रातील बेरडेपार, भांडेवाडी, अडेगाव, धानोली, तोंडली व खात - रेवराल जि प क्षेत्रातील धर्मापुरी, खात, घोटमुंढरी, मांगली (तेली) या गावांमध्ये उद्या शनिवार (ता.२१ नोव्हेंबर) ला दुपारी ११:३० वाजता पासून ते रात्री ८:३० वाजेपर्यंत पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दीपावली मिलन कार्यक्रमांतर्गत गाव भेट दौरा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



यानिमित्ताने ते त्या संबंधित गावातील नागरिकांची संवाद साधणार आहे. तरी या गाव भेट दौरा कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आव्हान भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे तथा माजी भाजपा मौदा तालुका मंडळ अध्यक्ष मुकेश अग्रवाल, खात-रेवराल जि प सर्कलच्या माजी जि प सदस्य राधा मुकेश अग्रवाल सह तालुक्यातील भाजपा व भाजयूमो पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

वाढोण्यात दोन दिवस रंगणार भक्ती, प्रबोधन आणि संस्कृतीचा जागर!

कार्तिक महोत्सवाचे २४ व २५ नोव्हेंबरला आयोजन; पालखी, रिंगण सोहळ्यासह सावित्रीबाई फुले ग्रंथालयाचे होणार उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

संतविचारांचा जागर, भक्तिरसाची अनुभूती आणि वाचनसंस्कृतीचा प्रसार अशा त्रिवेणी संगमातून वाढोणा (में) येथे दोन दिवसीय कार्तिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कला गौरव संस्था, नागपूर यांच्या पुढाकाराने २४ व २५ नोव्हेंबर रोजी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात हा महोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने प्रबोधनपर व्याख्यान, पालखी सोहळा, रिंगण सोहळा, काल्याचा कार्यक्रम तसेच सावित्रीबाई फुले ग्रंथालय व वाचनालयाचे उद्घाटन असे विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

ग्रामीण भागात संतपरंपरेचे विचार रुजविणे, नव्या पिढीला संत साहित्याची ओळख करून देणे, समाजात वाचनाची आवड निर्माण करणे आणि धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक एकोपा वाढविणे हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे. विशेष म्हणजे, ग्रंथालयाच्या उद्घाटनामुळे या महोत्सवाला ज्ञानप्रसाराचीही जोड मिळणार आहे.

मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता काटोलचे उपविभागीय कृषी अधिकारी बळीराम सातपुते यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी पराग पोटे, हभप विलास कुबडे आणि ठाणेदार विनोद जांभळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्घाटनानंतर सायंकाळी ७ वाजता राष्ट्रसंतांच्या विचारांचे प्रसारक तथा प्रसिद्ध सप्तखंजिरीवादक तुषार सूर्यवंशी यांचे प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या विचारांतून समाजप्रबोधनाचा संदेश मिळणार असून उपस्थितांना वैचारिक मेजवानी अनुभवता येणार आहे.

बुधवार, २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता प्राचार्य डॉ. राजेंद्र जाने आणि प्रा. वैशालीताई जाने यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीची पूजा होईल. सकाळी १० वाजता संत भारती महाराज हरिपाठ मंडळाच्या वतीने भजन-हरिपाठाच्या गजरात पालखी सोहळा व रिंगण सोहळा पार पडणार आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. दुपारी १ वाजता काल्याचा कार्यक्रम होईल.

यानंतर दुपारी १.३० वाजता रामटेकचे खासदार शामकुमार बर्वे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले ग्रंथालय व वाचनालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, युवकांना आणि वाचनप्रेमींना ज्ञानसंपादनासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विविध मान्यवरांची यावेळी उपस्थिती राहणार असून दुपारी २ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

भक्तीबरोबरच प्रबोधन आणि ज्ञानाचा संदेश

कार्तिक महोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेचे जतन करण्यासोबतच समाजाला संतविचारांची दिशा देण्याचा आणि वाचनसंस्कृती बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे हा महोत्सव केवळ धार्मिक सोहळा न राहता सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीला बळ देणारा उपक्रम ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या महोत्सवासाठी कला गौरव संस्था, सावित्रीबाई फुले ग्रंथालय व वाचनालय तसेच विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे सहकार्य लाभले आहे. परिसरातील नागरिक, भाविक, युवक आणि वाचनप्रेमींनी दोन्ही दिवस मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन कला गौरव संस्थेच्या अध्यक्ष प्रा. डॉ. संगीता बानाईत आणि सचिव भागवत बानाईत यांनी केले आहे.

थोडक्यात

दुष्काळसदृश परिस्थितीतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पंचनाम्याचा प्रश्न ऐरणीवर

सालेकसा तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी २३ नोव्हेंबरला तहसील कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक; उन्हाळी धान पिकाच्या सिंचन नियोजनावरही होणार चर्चा

दे. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे, नुकसान भरपाईसाठी पात्र लाभार्थ्यांची यादी आणि काही शेतकऱ्यांची नावे यादीतून वगळली गेल्याच्या तक्रारींवर चर्चा करण्यासाठी सालेकसा तहसील कार्यालयात २३ नोव्हेंबर रोजी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. तालुका कृषी अधिकारी, सालेकसा यांच्या कार्यालयाकडून २० नोव्हेंबर २०२६ रोजी यासंदर्भात अधिकाऱ्यांना पत्र जारी करण्यात आले आहे. शासनाने खरीप हंगाम २०२६ अंतर्गत पहिला टप्पा आणि दुसरा टप्पा लागू केलेल्या एकूण ३०५ तालुक्यांमध्ये गोंदिया जिल्ह्यातील आठही तालुक्यांचा समावेश असल्याचा उल्लेख पत्रात करण्यात आला आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांचे संयुक्त पंचनामे करण्याबाबत यापूर्वीही प्रशासनाकडून सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार संबंधित यंत्रणांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करणे अपेक्षित होते. मात्र, काही स्थानिक शेतकऱ्यांची नावे नुकसानग्रस्तांच्या यादीत समाविष्ट नसल्याच्या तक्रारी प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे या विषयावर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमक्ष सविस्तर चर्चा होणार आहे.

उन्हाळी धान पिकाच्या सिंचनाचेही होणार नियोजन

दरम्यान, उन्हाळी हंगामात धान पिकासाठी लागणाऱ्या पाण्याच्या वापराचे नियोजन करण्याबाबतही बैठकीत चर्चा होणार आहे. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता सालेकसा तहसील कार्यालयात ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये बेवारटोला, पुजारीटोला धरण आणि कालीसराड धरणाच्या पाण्याच्या नियोजनासंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे. या बैठकीला शाखा अभियंता, उपअभियंता, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी यांना उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी बैठकीला वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी यांनी केले आहे. आता या बैठकीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या तक्रारींची कितपत दखल घेतली जाते, पंचनाम्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळतो का आणि उन्हाळी धान पिकासाठी सिंचनाचे योग्य नियोजन होते का, याकडे सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

रायपूर येथे २२ नोव्हेंबरला लोधी समाजाचे भव्य परिचय संमेलन

खासदार बृजमोहन अग्रवाल, विजय बघेल यांची उपस्थिती; आमदार प्रीतम सिंह लोधी मुख्य अतिथी

दे. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे, सालेकसा

छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे लोधेश्वरधाम, लोधी क्षत्रिय समाजाच्या वतीने रविवार, २२ नोव्हेंबर २०२६ रोजी वार्षिक संमेलन, युवक-युवती परिचय संमेलन, दीपावली मिलन समारोह व स्मरणिका प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मध्यप्रदेशचे आमदार प्रीतम सिंह लोधी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, रायपूरचे खासदार बृजमोहन अग्रवाल आणि दुर्गचे खासदार विजय बघेल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय विविध संत-महात्मे, समाजाचे पदाधिकारी आणि महाराष्ट्रातील अखिल भारतीय लोधी, लोधा, लोध अधिकारी-कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत.

समेलनाचे विशेष आकर्षण म्हणजे विवाहयोग्य युवक-युवती परिचय मेळावा व त्यांच्या बायोडाटावर आधारित स्मरणिकेचे प्रकाशन. वावेळी गुणवंत विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच विविध कलाकारांच्या सांस्कृतिक व संगीत कार्यक्रमांचीही मेजवानी मिळणार आहे. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्पात असून, लोधेश्वरधामचे अध्यक्ष सुरेश कुमार सुलाखे यांच्यासह समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने समाजबांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. हे संमेलन सामाजिक एकता, सांस्कृतिक जतन आणि युवक-युवतींच्या परिचयासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

खेळाडूंना आवश्यक साहित्य व सुविधा उपलब्ध करून द्याव्या

क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड यांचा रामराव आंबोते व्यायाम शाळेला पाहणी दौरा




दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या क्रीडा विशेष समिती सभापती श्रीमती दर्शनी धवड यांनी शुक्रवार (ता. २०) रोजी सदर परिसरातील मनपाच्या रामराव आंबोते व्यायाम शाळेला भेट देऊन पाहणी केली. वावेळी त्यांनी व्यायामशाळेतील उपलब्ध क्रीडा साहित्य, व्यवस्था आणि आवश्यक सुविधांचा आढावा घेतला. वावेळी नगरसेवक श्री. विनोद कन्हेरे, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, क्रीडा निरीक्षक श्रीमती उज्वला चरडे, तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान व्यायामशाळेत सकाळी व सायंकाळी अशा दोन्ही सत्रांत मिळून सुमारे १५० खेळाडू व्यायाम व क्रीडा प्रशिक्षणासाठी येत असल्याची माहिती प्रशिक्षक व खेळाडूंनी दिली. वावेळी सभापती श्रीमती दर्शनी धवड यांनी खेळाडूंशी संवाद साधत त्यांना मिळणारे प्रशिक्षण, सरावासाठी उपलब्ध साहित्य तसेच व्यायामशाळेतील सुविधांचा आढावा घेतला. कुस्तीपटूंच्या सरावासाठी आवश्यक असलेल्या मातीची उपलब्धता करून देण्यासह खेळाडूंना आवश्यक असणारे इतर क्रीडा साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना सभापती दर्शनी धवड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण आणि सरावासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला.

ईडीने वाळू माफियांची नागपूर, भंडारा येथील १६.२३ कोटी रुपयांची मालमत्ता गोठविली

शहरातील आरोपींच्या चिंता वाढल्या



दे. सिंहवाणी वृत्त, सावनेर/नागपूर

नागपूर आणि भंडारा जील्हा येथील अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीद्वारे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक साम्राज्य उभारणाऱ्या वाळू तस्करांच्या टोळीला अंमलबारी संचालनालयाने (ईडी) मोठा धक्का दिला आहे. या प्रकरणात, ईडीच्या नागपूर उप-प्रादेशिक कार्यालयाने मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा २००२ अंतर्गत १६.२३ कोटी रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता जप्त केली आहे. यामधे अलीशान वाहाणे, जमीन, इमारती, घरे, व्यावसायिक दुकाने आणि फार्म हाऊस किंवा मालमत्ता यांचा समावेश आहे. किंवा या कारवाईमुळे वाळू माफियांमधे मोठी खळबळ उडाली आहे. यापूर्वी, वाळू माफियांवर छापा टाकल्यानंतर, ईडीने गुन्हेगारी स्वरूपाची कागदपत्रे, आर्थिक व्यवहारांच्या नोंदी, डिजिटल उपकरणे आणि रोख रक्कम जप्त केली असती. आलिशान वाहने, जेसीबी मशीन आणि पोकलेन एक्स्कॅव्हेटर जप्त करून ही रक्कम बँक खात्यांमध्ये जमा केली गेली आहे.

अवैध वाळू उत्खनन गुन्हा आणि पैसे किंवा मालमत्तेच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खरेदी प्रकरणातील तपास पूर्ण केल्याचा दावा ईडीने केला आहे. ईडीने हे स्पष्ट केले आहे की, ताज्या कारवाईनंतर किंवा या प्रकरणात जप्त केलेल्या, ताब्यात घेतलेल्या आणि तात्पुरत्या स्वरूपात जोडलेल्या मालमत्तांचे मूल्य २० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे किंवा मालमत्तेचे सध्याचे अंदाजित बाजारमूल्य ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.



जीपीएस तपासामुळे तस्करी उघडकीस

ईडी व्दारे गंभीर गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी त्यांच्या वाहनांमधील जीपीएस डेटाचे विश्लेषण करू शकते. कागदपत्रांमध्ये नमूद केलेले वाहन क्रमांक बरोबर होते, परंतु संबंधित वाहने प्रत्यक्षात मध्य प्रदेशातील गेलिच येथील नसल्याचे आढळून आले. याउलट, जीपीएस तपासणीत असे उघड झाले की, ते वाहन नागपूर कॅम्पसमधील अवैध वाळू उत्खनन स्थळांवर वारंवार जात होते.

अशा प्रकारे उत्खनन केलेली वाळू कोणतीही रॉयल्टी किंवा कर न भरता विकली जात होती. यामुळे सरकारी महसुलाचे मोठे नुकसान झाले आहे, असे ईडीने म्हटले आहे. अवैध व्यवहार, गुन्हेगारीतून मिळालेल्या पैशांची गुंतवणूक आणि संपूर्ण आर्थिक साखळी यांसंबंधीचा तपास अजूनही सुरू असल्याचे ईडीने स्पष्ट केले आहे.

बनावट ई-ट्रान्झिट पासचा गोरखधंदा

नागपूरच्या सदर आणि अंबाझरी पोलीस ठाण्यात नरेंद्र पिंपळे आणि इतर आरोपींविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे, ईडीने मनी लॉंड्रिंगचा तपास सुरू केला असता.बनावट इलेक्ट्रॉनिक ट्रान्झिट पास (ई-टीपी) वापरून अवैध वाळूचे उत्खनन, वाहतूक आणि विक्री केल्याचा आरोप आरोपींवर आहे. ईडीच्या तपासानुसार, वाळू माफियांच्या संघटित टोळीने वाहतूकदारांच्या संगनमताने, घाटांवरून विहित मयार्देपेक्षा जास्त आणि मंजूर क्षेत्राबाहेरून वाळूचे उत्खनन केले. बेकायदेशीर वाळू कायदेशीर असल्याचा आभास निर्माण करण्यासाठी, मध्य प्रदेशातील अधिकृत वाळू खाणींच्या नावाने बनावट ई-टीपी तयार करण्यात आले. प्रत्येक बनावट पासवर ६,००० ते १०,००० रुपये खर्च केले जात असल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

आरोपींच्या आप्तपरिवार, नातेवाईक, इष्टमीत्रांच्या संपत्तीची चौकशी व्हावी अशी मागणी होत असून ईडी विभागाने याकडे तपास वळविल्यास प्रकरणात अधिकच रंजकता वाढून.आरोपींसोबत फीरणारे, आरोपींचे हस्तक, आप्तपरिवार, नातेवाईक जे काहीही न करता अल्पशा काळात लखपती करोडपती झालेल्यांच्या संपत्ती या त्यांच्या की त्यांच्या नावावर आरोपींच्या याची सत्यता उघडकीस येईल. ईडी द्वारे १६.२३ कोटीची संपत्ती गोठवल्याने ईडी कारवाईतील शहरातील आरोपी व त्यांच्या हितचिंतकांचे धाबे दणाणले असुन. राजकीय पदाचा वापर वरून प्रकरण प्रलंबित करुण काहीकाळ वाचण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कहालीतील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचा प्रश्न अखेर तहसीलदारांच्या दारी

तहसीलदारांची संबंधित अधिकाऱ्यांसह गावाला प्रत्यक्ष भेट; शेतकऱ्यांशी दीर्घ चर्चा करून नुकसान भरपाईसाठी सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन, ६७७ शेतकरी अद्याप मदतीपासून वंचित



दे. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची भरपाई अद्याप मिळाली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शासनाच्या नुकसानग्रस्त ३५० तालुक्यांचा यादीत सालेकसा तालुक्याचा समावेश असतानाही येथील शेतकरी आर्थिक मदतीपासून वंचित आहेत. या गंभीर प्रश्नाची दखल घेत तहसीलदारांनी संबंधित कृषी, महसूल व ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्यांसह कहाली गावाला प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. शेतकरी हिताला प्राधान्य देऊन योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

६७७ शेतकऱ्यांचे नुकसान, मात्र भरपाईचा लाभ एकालाही नाही!

कहाली गावात मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले असून, तब्बल ६७७ शेतकरी अद्याप नुकसान भरपाईपासून वंचित असल्याची बाब ग्रामस्थांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिली. विशेष म्हणजे गावातील बहुतांश शेतकऱ्यांचे एकाच प्रकारे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असतानाही प्रत्यक्ष पंचनामे आणि नुकसान नोंदणी प्रक्रियेत योग्य ती दखल घेण्यात आली नसल्याचा आक्षेप ग्रामस्थांनी व्यक्त केला.

ग्रामस्थ, शेतकरी आणि युवकांचा बैठकीत उत्स्फूर्त सहभाग

तहसीलदारांच्या उपस्थितीत कहाली येथे पार पडलेली बैठक दीर्घकाळ चालली. या बैठकीत ग्रामस्थ, शेतकरी आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपल्या समस्या व व्यथा मांडल्या. केवळ कहाली गावालाच नव्हे, तर संपूर्ण सालेकसा तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा, अशी आग्रही मागणी करण्यात आली. यावेळी तहसीलदारांनी संबंधित कृषी अधिकारी, महसूल अधिकारी आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांना शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन काम करण्याचे निर्देश दिले. ज्या शेतकऱ्यांचे प्रत्यक्षात नुकसान झाले आहे, त्यांचे योग्य पद्धतीने पंचनामे करून प्रकरणांची तपासणी करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

आमदारांकडे मांडली होती व्यथा; 'वृत्तपत्रांनेही वेधले होते लक्ष!

कहाली येथील शेतकऱ्यांनी यापूर्वीही आपल्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी आमदार संजय पुराम यांची भेट घेऊन नुकसान भरपाईचा प्रश्न मांडला होता. दिवाळीच्या दिवशी झालेल्या या भेटीत ग्रामस्थांनी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणि प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईकडे लक्ष वेधले होते. या प्रश्नाला दैनिक वर्तमानपत्रांनेही प्रसिद्धी देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले होते. यापूर्वी ग्रामस्थांनी तहसीलदारांची भेट घेऊनही निवेदनाद्वारे न्यायाची मागणी केली होती.

आश्वासनानंतर आता प्रत्यक्ष निर्णयाची प्रतीक्षा!

तहसीलदारांनी स्वतः गावात येऊन शेतकऱ्यांचा समस्या जाणून घेतल्याने ग्रामस्थांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. केवळ आश्वासनावर न थांबता प्रत्यक्ष नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे योग्य पंचनामे करून त्यांना शासनाच्या नुकसान भरपाईचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे आता संपूर्ण कहाली गावासह सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. 'शेतकरी हित हेच सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. प्रत्यक्ष नुकसान झाले असताना तांत्रिक कारणांमुळे शेतकरी मदतीपासून वंचित राहू नयेत. संपूर्ण सालेकसा तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी,' अशी भावना सामाजिक कार्यकर्ता मानदास बसेना यांनी व्यक्त केली.

उत्कृष्ट कार्यकारिणी सदस्य पुरस्कार से राकेश गांधी अलंकृत

दे. सिंहवाणी वृत्त, नागपुर

नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स की गतिविधियों में उत्कृष्ट सहयोग, सक्रिय सहभागिता एवं उल्लेखनीय योगदान के लिए चेंबर के कार्यकारिणी सदस्य व सरकारी योजना उपसमिति के संयोजक राकेश गांधी को 'उत्कृष्ट कार्यकारिणी सदस्य पुरस्कार' से सम्मानित किया गया।

यह सम्मान चेंबर के भूतपूर्व अध्यक्ष स्व. प्रकाशचंद मेहाड़िया की स्मृति में स्थापित पुरस्कार के अंतर्गत प्रदान किया गया। केंद्रीय मंत्री नितिन गडकरी के करकमलों से तथा वित्त राज्यमंत्री आशीष जैसवाल व गृह राज्यमंत्री पंकज भोयर, सांसद मायाताई इवनाते की



उपस्थिति में, उन्हें पुरस्कार, चेंबर का दुपट्टा, शाल एवं श्रीफल भेंट कर भव्य सत्कार किया गया। इस अवसर पर उपस्थित व्यापारियों एवं पदाधिकारियों ने तालियों की गड़गड़ाहट से उनका अभिनंदन किया।

उल्लेखनीय है कि राकेश गांधी ने प्रधानमंत्री मुद्रा लोन योजना के अध्यक्ष रहते हुए नागपुर शहर के विभिन्न क्षेत्रों में शासकीय योजनाओं के शिविर आयोजित कर हजारों नागरिकों को योजनाओं का लाभ दिलाया था। उसी जनसेवा के संकल्प को आगे बढ़ाते हुए उन्होंने नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स के बैनर तले नागपुर के सभी विधानसभा क्षेत्रों में समस्त शासकीय योजनाओं के शिविर आयोजित किए।

उनके इस प्रयास से नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स महाराष्ट्र की पहली ऐसी व्यापारिक संगठन बन गई है, जो निरंतर जनकल्याणकारी योजनाओं के शिविर आयोजित कर आम जनता को सीधे लाभ पहुंचा रही है। इन शिविरों के माध्यम से अब तक हजारों नागरिक लाभान्वित हो चुके हैं।

अपने सम्मान पर राकेश गांधी ने चेंबर के अध्यक्ष स्वप्निल अहिरकर, पूर्व अध्यक्षगण दिपेन अग्रवाल, आश्विन मेहाड़िया, अर्जुनदास आहुजा, फारुख भाई अकबानी, वर्तमान पदाधिकारीगण एवं समस्त कार्यकारिणी सदस्यों के प्रति हृदय से आभार व्यक्त किया। उन्होंने कहा कि यह सम्मान संपूर्ण चेंबर परिवार के सामूहिक प्रयासों का परिणाम है और भविष्य में भी वे इसी निष्ठा से समाजसेवा के कार्य करते रहेंगे।

सूत्रसंचालन विविध घटकांना जोडणारा सेतू : रेणुका देशकर

नागपूर जिल्हा महिला साहित्य संमेलनात 'सूत्रसंचालन : सेतू की संकट' वर

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर सूत्रसंचालन ही केवळ दोन-चार ओळी बोलण्याची कला नसून कार्यक्रमातील विविध घटकांना जोडणारा महत्त्वाचा सेतू आहे. योग्य शब्दांची निवड, वेळेचे भान, अभ्यास, नम्रता आणि प्रसंगानुरूप निवेदनाची शैली यांमुळे सूत्रसंचालकाची स्वतंत्र ओळख निर्माण होते, असे प्रतिपादन प्रसिद्ध निवेदिका रेणुका देशकर यांनी केले.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित महिला महाविद्यालय, नागपूर यांच्या वतीने आयोजित जिल्हा महिला साहित्य संमेलनात 'सूत्रसंचालन : सेतू की संकट' या विषयावर परिसंवाद पार पडला. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी रेणुका देशकर होत्या. वृषाली देशपांडे, आश्विनी जांभेकर-पितळे आणि मनीषा रिठे यांचा यात सहभाग होता.

अतिशयोक्तीपूर्ण शब्दांचा वापर टाळून प्रोटोकॉल, स्थानिक बोलीभाषा आणि वेळेचे भान ठेवत पूर्वतयारीने केलेले सूत्रसंचालन प्रभावी ठरते, असे वृषाली देशपांडे म्हणाल्या. आश्विनी जांभेकर-पितळे यांनी सूत्रसंचालन हे फुलांच्या



माळेसारखे असावे, असे सांगितले. नम्रता, लवचिकता, वाचनाची सवय आणि सखोल अभ्यास हे सूत्रसंचालकाचे महत्त्वाचे गुण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर मनीषा रिठे यांनी सूत्रसंचालकाला स्वतंत्र विषयावर बोलण्यासाठी आमंत्रित करणारा हा कौतुक केले. परिसंवादाचे नावीन्यपूर्ण उपक्रम असल्याचे सांगत त्यांनी आयोजकांचे यांनी केले, तर आभार डॉ. सूत्रसंचालन प्रा. सायली लाखे भारती पेंदाम यांनी मानले.

कवितेतील प्रामाणिकपणा व आशय महत्वाचा : सुनील यावलीकर

'मी अलीकडे वाचलेल्या स्त्रियांच्या कविता' या विषयावर परिसंवाद

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर : प्रत्येक कवयित्रीची अभिव्यक्ती, तिच्या जाणिवा आणि व्यक्त होण्याची पद्धत वेगळी असते. त्यामुळे एका कवितेची दुसऱ्या कवितेशी तुलना करण्यापेक्षा तिच्यातील प्रामाणिकपणा आणि आशय समजून घेणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन स्त्री-कवितेतील विविध जाणिवांचा वेध घेताना सुनील यावलीकर यांनी केले. जिल्हा महिला साहित्य संमेलनात 'मी अलीकडे वाचलेल्या स्त्रियांच्या कविता' या विषयावरील परिसंवादाचे सुनील यावलीकर अध्यक्ष होते. या परिसंवादात डॉ. अमृता इंदुरकर, माधवी भट, संघमित्रा खंदारे आणि मनोज मोहिते सहभागी झाले.



डॉ. अमृता इंदुरकर यांनी स्त्रीचे भावविश्व, आत्मशोध, स्वतंत्र अस्तित्व, निसर्गाशी असलेले नाते, सामाजिक बांधिलकी आणि नातेसंबंधांतील हळुवारपणा या विषयांवर त्यांनी प्रकाश टाकला. तर माधवी भट यांनी '९०ज किड्स' पिढीच्या कवितांचा आढावा घेत स्त्री-कवितेचा प्रवास जात्यावरच्या ओव्यांपासून गाडीच्या स्टेअरिंगपर्यंत उलगडला. संघमित्रा खंडारे यांनी स्त्री-कवितेचा उगम जात्यावरच्या ओव्या, अंगाईगीते, पाळणे आणि मंगलाष्टकांसारख्या लोकपरंपरांमध्ये असल्याचे सांगितले. तर मनोज मोहिते यांनी 'अलीकडे वाचलेल्या कविता' आणि 'अलीकडे वाचलेली स्त्रियांची कविता' या विषयांचा धांडोळा घेत 'आई' या सूत्राला केंद्रस्थानी ठेवून विचार मांडले. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. क्षमा चव्हाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रमिला मोहिते यांनी केले. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.

थोडक्यात

तारसा येथील फुटलेल्या ताळपत्री बंधाऱ्याची चौकशी करा : देवेंद्र गोडबोले



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा

यंदा कोरड्या दुष्काळावर मात करण्यासाठी रामटेक व कामठी विधानसभा क्षेत्र अंतर्गत येत असलेल्या रामटेक, कामठी, पारशिवनी व मौदा तालुका अंतर्गत येत असलेल्या गावांमधील नदी नाल्यांवर ताडपत्री बंधारे बनविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. मात्र तारसा येथील बनविण्यात आलेला ताळपत्री बंधारा अल्पावधीतच फुटल्याने त्या बंधाऱ्यात साचलेला पाणी बाहेर निघून गेलेला आहे. या बंधाऱ्याची दयनीय अवस्था दाखवणारा व्हिडिओ माजी जि प सदस्य देवेंद्र गोडबोले यांनी स्वतःच्या स्टेटसवर ठेवून सोशल मीडियावर वायरल केलेला आहे. त्या व्हिडिओच्या माध्यमातून त्यांनी सांगितले की, वरील चारही तालुक्यात ताडपत्री बंधारे बनविण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत २ कोटी ७५ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे तारसा येथील फुटलेल्या बंधाऱ्यासह इतरही बंधाऱ्याची संबंधित शासकीय विभागाने चौकशी करावी, अशी मागणी गोडबोले यांनी केली आहे.

दुष्काळ परिस्थिती लक्षात घेता 'कारंजे' ठेवणार बंद

स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांच्या निर्देश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दुष्काळ परिस्थिती आणि संभाव्य पाणी टंचाईची शक्यता लक्षात घेऊन मनपाने पाणी बचत व जलसंवर्धनासाठी कार्य आरंभिले आहे. आगामी काळात नागपुरातील संभाव्य पाणी टंचाई बघता मनपाद्वारे काही ठिकाणचे कारंजे बंद ठेवण्याचे निर्देश स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे यांनी दिले आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणांचे सौंदर्य आणि स्वच्छता जपण्याच्या दृष्टीने नागपूर महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील आहे.याच अनुषंगाने कार्ंज्याचा प्रश्न नागपूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या समन्वयातून यशस्वीरीत्या मार्गी लावण्यात आला असून, हे कारंजे पुन्हा सुरू करण्यात आले होते. परंतु, संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेता शहरातील काही ठिकाणचे कारंजे बंद ठेवण्याचे तसेच प्रासंगिक देखभाल दुरुस्तीसाठी काही वेळ कारंजे सुरू ठेवण्यात येतील अशी माहिती स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी दिली आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी कारंजे बंद असल्याच्या समस्येकडे नागरिकांनी लक्ष वेधल्यानंतर स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी या प्रकरणाची वैयक्तिक दखल घेतली. संबंधित उद्यान विभाग तसेच इतर आवश्यक विभागांशी समन्वय साधत त्यांनी कामाचा सातत्याने पाठपुरावा केला. अवघ्या तीन दिवसांत आवश्यक कार्यवाही पूर्ण करून कारंजे पुन्हा कार्यान्वित करण्यात प्रशासनाला यश आले. परंतु, पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी कारंजे बंद ठेवण्याचे निर्देश स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी दिले आहे. तसेच याकरिता नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

खंडाळा घाटाटे येथे विशेष डीबीटी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

१०० हून अधिक लाभार्थ्यांनी घेतला शिबिराचा लाभ



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांसाठी ग्रामपंचायत खंडाळा घाटाटे, ता. पारशिवनी येथे शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष डीबीटी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. खंडाळा घाटाटे, बोरी सिंगारदीप व गहू हिवरा या गावांतील १०० हून अधिक लाभार्थ्यांनी शिबिरात सहभागी होऊन योजनेचा लाभ घेतला. या शिबिराला प्रमुख उपस्थिती म्हणून पारशिवनी संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष राजू भोस्कर, पारशिवनी तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजनेचे अधिकारी प्रीतम जी शेंडे, कर्मचारी नूतन बर्वे, खंडाळा घाटाटे गावच्या सरपंच बोरकुटे मॅडम, उपसरपंच चेतन कुंभलकर, ग्रामपंचायत सदस्य व सामाजिक कार्यकर्ते प्रेमजी धमरि उपस्थित होते.

तसेच बोरी सिंगारदीप गावचे सरपंच अशोक जी कोहने, गहू हिवरा गावातील सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल बोरकुटे यांच्यासह परिसरातील मान्यवर नागरिक व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाच्या विविध सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ पारशिवनी तालुक्या पासून दुर व अती दुर्गम भागातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत सुलभतेने मिळावे व तसेच डीबीटी प्रक्रियेमध्ये लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या माध्यमातून अनेक लाभार्थ्यांना मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य मिळाले.

उमरेड वेकोली कॉलनीत पाण्याची उधळपट्टी ?

बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणारा का?

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड
मनिष शिंगणे

उमरेड शहरासह परिसरात यंदा कमी पावसामुळे संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची चिन्हे असताना, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे. वेकोली उमरेड कॉलनीत मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होत असल्याचा गंभीर प्रकार समोर येत आहे. त्यामुळे पाणी वाचविण्याचे आवाहन करणाऱ्या प्रशासनाने वेकोली कॉलनीतील या कथित पाणी अपव्ययाकडे कधी लक्ष देणार? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते हुसेंद्र गिरडकर यांनी उपस्थित केला आहे.



कॅनलमधून पाणी उचलण्याबाबतही प्रश्नचिन्ह

कळमना परिसरातील कॅनलमधून पाणी घेऊन कान्हवा रोड परिसरात साठवणूक करून मोटारपंपाद्वारे वेकोली कॉलनीला पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती कळमना येथील नागरिकांकडून समोर आली आहे. या पाणीउपशासाठी संबंधित पाटबंधारे विभागाची अधिकृत परवानगी तसेच आवश्यक मागणी प्रक्रिया करण्यात आली आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

या संपूर्ण पाणीउपसा प्रक्रियेची पाटबंधारे विभागाने प्रत्यक्ष चौकशी करून परवानगी, मागणीपत्र, पाणीउपसा आणि वापराची नोंद तपासणे गरजेचे आहे. अधिकृत परवानगी नसल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही सामाजिक कार्यकर्ते राजेश राहाटे यांनी केली आहे.

वेकोली वसाहतीत नळातून वाहतेय पाणी

वेकोली वसाहतीमध्ये सकाळी ७ वाजता आणि दुपारी ३नंतर दररोज साधारण एक तास पाणीपुरवठा होत असल्याचे सांगण्यात येते. मात्र, अनेक क्वार्टरमध्ये पाण्याच्या टाक्या भरल्यानंतरही नळ सुरू राहून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जात असल्याचे निदर्शनास येत असल्याचा आरोप स्थानिक असलेले नागरिकांनी केला आहे. काही क्वार्टरमध्ये नळांना तोट्याच नसल्याने पाणी थेट बाहेर वाहत असल्याचेही सांगण्यात येत आहे. काही निवासस्थाने बंद असतानाही त्यांच्या परिसरात पाण्याचा अपव्यय होत असल्याचे चित्र असल्याने वेकोली प्रशासनाच्या पाणी व्यवस्थापनावरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अधिकारी-कर्मचारी राहतात; मग पाण्याचा अपव्यय दिसत नाही का?

वेकोली प्रशासनातील अनेक अधिकारी व कर्मचारी वसाहतीतील क्वार्टरमध्ये वास्तव्यास असल्याचे सांगितले जाते. काही अधिकारी-कर्मचारी नागपूरहून ये-जा करीत असले तरी त्यांच्या नावावर वसाहतीतील क्वार्टर असल्याचेही निदर्शनास येत आहे. अशा परिस्थितीत वसाहतीतील पाणीपुरवठ्याची प्रत्यक्ष पाहणी करून नळांची दुरुस्ती, गळती रोखणे आणि पाण्याचा अपव्यय थांबविण्याची जबाबदारी कोणाची? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

पिण्याच्या पाण्याचा गैरवापर?

पिण्यासाठी उपलब्ध असलेल्या स्वच्छ पाण्याचा वापर घरगुती साफसफाईसह विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणावर होत असल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यास त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना बसणार असताना उपलब्ध पाण्याचा अशा प्रकारे अपव्यय कितपत योग्य आहे, असा सवाल शिवसेना शिंदे गट नेते राजू मेश्राम यांच्या कडून केला आहे.

पांढराबोडी तलावातील साठाही घटला

उमरेड पाटबंधारे विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक पांढराबोडी तलावातील सुमारे ६० टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याचे सांगण्यात येते. याच जलसाठ्यावर नगर परिषदेसोबतच वेकोली प्रशासनालाही पाणीपुरवठा केला जात असल्याने उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करणे अत्यावश्यक झाले आहे. एकीकडे पावसाचे प्रमाण कमी, जलसाठा घटत असताना आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी वेकोली वसाहतीत पाण्याचा अशा प्रकारे अपव्यय होत असेल तर त्याची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे.

'पाणी वाचवा'चा सल्ला केवळ नागरिकांसाठीच का ?

पाणीटंचाई टाळण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असा शासनाचा स्पष्ट संदेश आहे. मात्र, वेकोली उमरेड सारख्या मोठ्या संस्थांच्या कॉलनीतच मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होत असल्यास त्यांच्यावरही समान निकषाने कारवाई झाली पाहिजे. नागरिकांनी पाणी वाचवायचे आणि प्रशासनाच्या अखत्यारितील कॉलनीतीत पाणी वाया जाऊ द्यायचे, असा दुहेरी निकष चालणार नाही, अशी भावना माजी नगराध्यक्षा शशिकला बेले यांनी व्यक्त केली आहे.

चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी

वेकोली वसाहतीतील पाणीपुरवठा व्यवस्था, कॅनलमधून होणारा पाणीउपसा, संबंधित परवानग्या, पाणी वापराचे प्रमाण, क्वार्टरमधील गळती आणि पाण्याचा अपव्यय यांची पाटबंधारे विभाग, संबंधित वरिष्ठ प्रशासनाने संयुक्तपणे तातडीने चौकशी करावी, अशी मागणी नगर परिषद गटनेता विशाल देशमुख यांनी केली आहे

पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकारी-कर्मचारी किंवा जबाबदार यंत्रणेवर नियमाप्रमाणे कठोर कारवाई करून त्याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शिवसेना नेते ठाकरे गट प्रकाश वारे यांनी केली आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जात असेल तर वेकोलीच्या एकाही जबाबदार अधिकाऱ्याचा निदर्शनास हे आले नाही का? आणि आले असेल तर आजपर्यंत कारवाई का झाली नाही? असा थेट सवाल नगरसेवक महेश भुयारकर यांनी उपस्थित केला आहे.

दैनिक सिंहवानी वृत्तच्या बातमीची दखल

अखेर चिनोरा ग्रामपंचायतने नालीसफाईचे काम घेतले हाती





चिनोरा पारधी टोला येथे वर्षभरापासून नालेसफाई नाही! स्वच्छतेचा उडाला बोजवारा नाल्या तुंबल्याने पाणी पास होईणा, ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा- धर्मेंद्र शेरकुरे

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा
धर्मेंद्र शेरकुरे

वरोरा तालुक्यातील चिनोरा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या हुडकी खदान, पिपरबोडी (पारधी टोला),गिरिकुंज,हेलन केलंन नगर, वानखेडे लेआऊट व चिनोरा येथील नालेसफाई गतवर्षी पासून करण्यात आली नव्हती त्यामुळे गावात अस्वस्थता दुर्गंधी पसरली होती. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. पावसाळ्यात डासांची उत्पत्ती वाढली गावात डेंग्यू, हिवताप, मलेरिया तसेच टायफाईड सारख्या रोगांचा प्रादुर्भाव झाला होता.

अनेक रुग्ण नागरिकांना दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. तसेच दवाखान्यासाठी आर्थिक भुर्दड सोसावा लागला. याबाबत दैनिक सिंहवानी वृत्तने बातमी प्रकाशित केली होती त्याची दखल घेत ग्रामपंचायत अधिकारी श्रीकांत कदम व प्रशासक यांनी नालेसफाईचे काम हाती घेऊन मजुरांकडून पारधी टोला पिपरबोडी येथील नाली सफाई करण्यात आली. पारधी टोला पिपरबोडी येथील नागरिकांनी ग्रामपंचायतचे आभार मानले आहे.

अनधिकृत बॅनर, पोस्टर्स अन् होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर मनपा करणार कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार, नागपूर शहर स्वच्छ, सुंदर आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेने अनधिकृत आकाशचिन्हे, जाहिरात फलक, बॅनर, कट-आउट, पोस्टर्स, स्वागतद्वार, तोरणे आणि पताका प्रदर्शित करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार आहे. विशेष म्हणजे, राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर २०२६ पासून नागपुरात सुरू होत आहे. नागरिक, विविध संस्था, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक व व्यावसायिक संघटनांनी सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत जाहिरात फलक लावू नयेत, तसेच अनधिकृत जाहिरातींबाबत मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी असे आवाहन मनपाचे उपयुक्त श्री.मिलिंद मेश्राम यांनी केले आहे.

नागपूर महानगरपालिका क्षेत्रात सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, व्यावसायिक किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी परवानगीशिवाय आकाशचिन्हे, बॅनर, कट-आउट, तोरणे अथवा जाहिरात फलक उभारणे कायद्याने प्रतिबंधित आहे. अशा अनधिकृत जाहिरात फलकांवर संबंधित व्यक्ती, संस्था, राजकीय पक्ष किंवा ज्यांच्यासाठी जाहिरात प्रदर्शित करण्यात आली आहे, त्यांची जबाबदारी निश्चित करून संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

वरोरा येथील भारत पेट्रोलपंप समोर पेट्रोल डिझेल टॅंकर उलटला, थोडक्यात जिवितहानी टळली

दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा
धर्मेंद्र शेरकुरे

नागपूर -चंद्रपूर महामार्गावर वरोरा शहरा जवळील एकार्जुना येथील मालू पेट्रोल पंप समोर गुरुवारी रात्री १२.३० वाजता मध्यरात्री २० नोव्हेंबरला पेट्रोल आणि डिझेल वाहतूक करणाऱ्या टॅंकरला अचानक भीषण आग लागली. टॅंकर मधील इंधनाने पेट घेतल्याने आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केले. आगीच्या प्रचंड ज्वाला आणि धुरांचे लोट दूरवरून दिसत असल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

एम एच ३४ बी झेड ४०१९ क्रमांकाचा हा टॅंकर नागपूर येथील बोरखेडी डेपोतून चंद्रपूरच्या दिशेने जात असल्याची माहिती आहे. टॅंकरमध्ये पेट्रोल आणि डिझेल दोन्ही असल्याचे सांगण्यात येत आहे. टॅंकरला आग लागल्यानंतर इंधन रस्त्यावर सांडल्याने आगीची तीव्रता आणखी वाढली या आगीत रस्त्यालगत असलेल्या दसू झाडे यांच्या ढाब्याचे मोठे नुकसान झाले आहे. तेथील चारचाकी आणि दुचाकी वाहने जळुन खाक झाली. या घटनेचे गांभीर्य अधिक होते. कारण अपघात स्थळाच्या एका बाजूला भारत पेट्रोलियम कंपनीचा पेट्रोल पंप व गॅस स्टेशन तर दुसऱ्या बाजूला रेल्वे मार्ग आहे. टॅंकर मधील पेट्रोल डिझेलच्या आगीने पेट्रोल पंपापर्यंत पोहोचल्यास मोठी दुर्घटना घडण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र अग्निशमन दल आणि पोलिसांनी तत्परतेने





घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे संभाव्य मोठा धोका टळला या घटनेत टॅंकर चालक सुखरूप असल्याची माहिती असून कोणतीही जीवित हानी झाली नाही.

आगीमुळे चंद्रपूर नागपूर महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी बंद करण्यात आली होती. शुक्रवारी सकाळी चंद्रपूरकडे जाणारी वाहतूककही काही काळ विस्कळीत झाली होती त्यानंतर जळालेल्या टॅंकरला रस्त्याच्या बाजूला करण्याची कार्यवाही करण्यात आली. दरम्यान टॅंकरला आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारत पेट्रोलियम कंपनीच्या इंधन वाहतूक करणाऱ्या टॅंकरची मध्यरात्रीच्या वेळी होणारी वाहतूक नियमानुसार आहे का याची संबंधित विभागाने तपासणी करावी अशी मागणी होत आहे. तसेच आगीत धाब्याचे आणि वाहनाचे नुकसान झाल्याने भारत पेट्रोलियम कंपनीने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी धाबामालक दसू झाडे यांनी केली आहे.

या घटनेमुळे इंधन वाहतूक करणाऱ्या टॅंकरची सुरक्षितता तांत्रिक तपासणी आणि वाहतुकीच्या नियमांच्या पालनांचा प्रश्न पुन्हा ऐरणेवर आला आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी या घटनेची सखोल चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.